जिल्ह्यातील निकडीच्या प्रश्नांना वाचा फोडणारे एकमेव दैनिक
संस्थापक कै. आचार्य गुंदेचा
# नवा मराठा
फोन–२४१४१४१, २४१७७७७
भाडोत्री म्हणून वर्षानुवर्ष जगण्यापेक्षा निर्भिड म्हणून क्षणभर जगण्यात जीवनाचे खरे सार्थक आहे. – कै.आचार्य गुंदेचा
email - navamaratha@gmail.com

# श्रीगोंदा व जामखेड तालुक्यात वादळी वाऱ्यासह अतिवृष्टी, पाण्यात वाहून गेल्याने १ जणाचा मृत्यू; वीजपुरवठा खंडित

**जनजीवन विस्कळीत**

नगर – श्रीगोंदा तालुक्यातील उख्खलगाव परिसरात ८ जून रोजी दुपारी तीन वाजता ढगफुटी सदृश जोरदार पाऊस झाला. जोरदार पावसाने आलेल्या पुराच्या पाण्याचा अंदाज न आल्याने डोंगरावर जनावरांना चरायला घेऊन गेलेल्या भाऊसाहेब हरिभाऊ कोरेकर ही व्यक्ती पाण्यात वाहून गेल्याने मृत्यू झाल्याची घटना घडली. तर अनेक घरांच्या भिंती पडल्याने तसेच जोरदार पावसामुळे अचानक आलेल्या पाण्याच्या लोंढ्याने शेतजमिनी पिकांसह वाहून गेल्याने मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. पुरामुळे विसापूर–पारनेर रस्त्यावरील पुलावरून पाणी वाहत असल्याने हा रस्ता रात्री उशिरापर्यंत वाहतूकीसाठी बंद होता. तसेच जामखेड तालुक्यातील खर्डा परिसरातही ९ जून रोजी वादळी वाऱ्यासह जोरदार पाऊस झाला आहे. त्यामुळे महावितरणची यंत्रणा पूर्णपणे कोलमडली असून वीज पुरवठा खंडित झाला आहे.

याबाबत अधिक नुसार तालुक्यातील विसापूर,उख्खलगाव, सुरेगाव परिसरात रविवारी दुपारी वादळी वार्यासह जोरदार पावसाचे आगमन झाले होते. दुपारी चार वाजण्याच्या सुमारास उख्खलगाव परिसरातील खंडोबा मंदिराच्या डोंगरावर अचानकपणे ढगफुटी सदृश पावसाला सुरुवात होऊन डोंगराच्या उतारावरील पाणी साठवण्यासाठी केलेल्या ताली फुल होऊन वाहू लागल्या तर काही ताली फुटल्याने पाण्याचा लोंढा अचानक वाहून परिसरातील ओढ्यावर पूर परिस्थिती निर्माण झाली. डोंगरावर चरण्यासाठी नेलेले जनावरे माघारी घेऊन जात असताना ओढ्याला अचानक आलेल्या पुरामध्ये काही जनावरे बाहेर निघाली तर काही वाहू लागल्याने त्यांना वाचविण्याच्या प्रयत्नात पाण्याचा अंदाज न आल्याने कोरेकर हे पाण्यात वाहून गेले.

स्थानिक तरुणांच्या मदतीने रात्री आठ वाजण्याच्या सुमारास त्यांचा मृतदेह शोधण्यात यश आले. अचानक आलेल्या पुराच्या पाण्याने परिसरातील शेतजमिनी पिकांसह वाहून गेल्या, परिसरातील फळबागांचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले. जोरदार पावसाने तीन ते चार घरांच्या भिंती पडल्याने मोठ्या प्रमाणात वित्तहानी झाली. विसापूर–पारनेर रस्त्यावरील पुलावरून पाणी वाहत असल्याने हा रस्ता रात्री उशिरापर्यंत वाहतूकीसाठी बंद असल्याने रविवारी विसापूर येथील आठवडे बाजार असल्याने बाजारासाठी रांजणगाव मशीद, बाबूर्डी, कडूस, तालुक्यातील चांभूर्डी, सारोळा सोमवंशी व उखलगाव येथून आलेल्या नागरिकांची पुरामुळे तारांबळ उडाली.

## जामखेडमध्ये महावितरणच्या ३ उपकेंद्रांचा वीज पुरवठा बंद

दरम्यान जामखेड खर्डा परिसरातही ९ जून रोजी जोरदार पाऊस व तीव्र चक्री वादळ झाले आहे. महावितरणच्या खर्डा कक्षा अंतर्गत येणारे चारही सबस्टेशन च्या विविध भागामध्ये मोठ्या प्रमाणात उच्च दाब आणि लघु दाब वीज वाहिन्यांचे पोल पडले व तुटले आहेत. तसेच अनेक ठिकाणी कंडक्टर देखील तुटले आहेत. पूर्ण सेक्शन मधील उच्च दाब आणि लघु दाब लाईनवर झाडे देखील पडल्याची माहिती मिळाली आहे. वरील कारणास्तव ३३ केव्ही खर्डा ,३३ केव्ही तरडगाव आणि ३३ केव्ही राजुरी या तीनही उपकेंद्राच्या ३३ केव्ही लाईन ब्रेक डाऊन झाल्या आहेत.केवळ ३३ केव्ही नायगांव उपकेंद्र अंतर्गत असणारे ११ केव्ही देवदैठण गावठाण फिडर चालु झाले आहे. इतर ठिकाणी वीज पुरवठा खंडित झाला आहे.

# सह्याद्री ‘मल्टिसिटी’च्या दरेवाडी शाखेत अडकले १८ ठेवीदारांचे ६६ लाख रुपये

**चेअरमन संदीप थोरातसह संचालक, कर्मचारी अशा १३ जणांवर फसवणुकीचा गुन्हा दाखल**

नगर – सह्याद्री मल्टिसिटी निधी लिमिटेड या संस्थेच्या दरेवाडी (ता. नगर) शाखेत चेअरमनसह १३ व्यक्तींनी मिळून १८ जणांची ६६ लाख रूपयांची फसवणूक केल्याचा आरोप करण्यात आला आहे. या प्रकरणी प्रमोद राजेंद्र साठे (वय ४१, रा. नारायणडोहो) यांनी ९ जून रोजी दुपारी भिंगार कॅम्प पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे.

दिलेल्या फिर्यादीवरून संस्थेचा चेअरमन, व्हाईस चेअरमन, संचालक, सीईओ, मॅनेजर, पासिंग ऑफिसर, कॅशिअर, वित्तीय अधिकारी, कार्यकारी संचालक अशा १३ जणांविरूध्द गुन्हा दाखल करण्यात आला आहे. चेअरमन संदीप थोरात, व्हाईस चेअरमन प्रिती सागवान यांच्यासह एकनाथ भालसिंग, दिलीप तात्याभाऊ कोरडे, ईश्वर मचे, संतोष रोकडे, नवनाथ लांगडे, विश्वास पाटोळे, संजय कर्पे, सुधाकर शेलार, (पूर्ण नावे माहिती नाही) यांच्याविरूध्द हा गुन्हा दाखल झाला आहे. फिर्यादी साठे यांनी २०२२ सालापासून या संस्थेमध्ये ९ लाख रूपयांची गुंतवणूक केली होती. संस्थेकडून सुरूवातीला १५ टक्के व्याजदर आणि नियमित परताव्याचे आमिष दाखवून गुंतवणूक करवून घेतली गेली. संस्थेचे चेअरमन थोरात याच्यासह दिलीप कोरडे, प्रिती सांगवान, एकनाथ भालसिंग, विश्वास पाटोळे, संजय चिरके, ईश्वर मचे, संतोष रोकडे, शुभम करपे, पियुष संचेती इत्यादींनी साठे व इतर ठेवीदारांचा विश्वास संपादन करून पैसे गोळा केले.

फिर्यादीत नमूद केल्याप्रमाणे, संस्थेने काही काळ दरमहा व्याज स्वरूपात आणि थोडी – थोडी रक्कम रोख व ऑनलाईन स्वरूपात परत केली. मात्र सप्टेंबर २०२३ नंतर दरेवाडी शाखेचे कामकाज पूर्णतः बंद करण्यात आले. त्यानंतर मुख्य शाखा, सावेडी (नगर) येथूनही व्यवहार बंद झाल्याने अनेक गुंतवणूकदार अडचणीत आले. दरम्यान, संस्थेने ठेवीदारांना वेगवेगळ्या तारीख व वेळेवर फसव्या चेकव्दारे आणि खोटी पत्रे देऊन उशीराने रक्कम परत करण्याची फसवी हमी दिली. अखेरीस संशयित आरोपींनी विविध बहाण्यांनी उर्वरित रक्कम न देता वेळ मारून नेत गुंतवणूकदारांना अंधारात ठेवले. अनेक वेळा तक्रार देण्याचा इशारा दिल्यावर गुन्हेगारांनी धमकी व कायदेशीर गुंतागुंत दाखवून तक्रार रोखण्याचा प्रयत्न केला, असेही फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.

या संपूर्ण आर्थिक फसवणुकीत फिर्यादी साठे यांच्यासह १८ गुंतवणूकदारांचा समावेश आहे. एकत्रित ९१ लाख ९१ हजार ६१० रूपये रक्कम असून त्यातील केवळ २५ लाख ८५ हजार ५०० रूपये परत करण्यात आले आहेत. म्हणजेच तब्बल ६६ लाख ६ हजार ११० रूपये गुंतवणूकदारांना मिळालेले नाही. त्यांची फसवणूक झाल्याचे फिर्यादीत म्हंटले आहे.

## खोदलेले रस्ते व बंद सिग्नलमुळे उडाला वाहतुकीचा बोजवारा; वटपौर्णिमेनिमित्त सिग्नलला काळा दोरा बांधून नोंदवला निषेध

*(पान १ वरुन)* सर्वच बंद बंद सिग्नलला दोरा बांधून प्रशासना कडे सुरक्षेची प्रार्थना करीत आहेत. यामधूनही जिल्हा प्रशासन आणि लोकप्रतिनिधी यांनी जर धडा घेतला नाही, व पुरेसे पोलिसांचे मनुष्यबळ तात्काळ वाढवले नाही आणि बंद असलेले सर्व सिग्नल चालू केले नाहीत, तर आता बंद सिग्नलला दोरा बांधला आहे त्यानंतर मात्र संबंधित अधिकाऱ्यांना त्यांच्या कार्यालयात येऊन असेच काळे दोरे बांधायची वेळ येईल असे आंदोलन करायची प्रशासनाने वेळ आणू नये, असा इशारा जनहित परीक्षा आणि जागरूक नागरिक मंचाचे अध्यक्ष सुहासभाई मुळे यांनी दिला. यावेळी माजी उपमहापौर गीतांजली काळे, करुणा कुकडे, मयुरी मुळे, सारिका कुकडे, युगंधरा अंतरकर, गोविंद कुकडे आदी नागरिक आदी उपस्थित होते.

## प्रेरणादायी अक्षरधन...



कृष्ण – अर्जुन

### ‘महा’भारत – जीवनाचे अद्भूत बोध

महाभारत – रामायण ही २ ग्रंथ म्हणजे सनातनी भारतीय संस्कृतीची २ हिरे आहेत. आज महाभारताविषयी विचार करूया. नीट वाचन, मनन करण्याचा प्रयत्न केल्यास महाभारत जीवनाचे मर्म सांगतो. जीवन कला शिकवतो.

महाभारतरूपी लोणी ज्ञानरूपी अग्नीने कढवून त्यातून जे साजूक तूप निर्माण झाले ते म्हणजे ‘गीता’ होय. भगवान श्रीकृष्णाने अर्जुनाला सांगितलेली गीता या अनमोल ग्रंथाचे श्रवण, मनन करून अनुभव घेणे महत्त्वाचे.

१७ ते १९ व्या श्लोकात सर्वश्रेष्ठ भगवान म्हणतात, ‘‘अर्जुना! कृत, त्रेता, द्वापार आणि कली या युगांच्या चौकड्या हजार वेळा जातात तेव्हा ब्रह्मदेवाचा एक परिपूर्ण दिवस होतो आणि त्याच रितीने चार युगे हजारांच्या संख्येने भरली म्हणजे त्या सत्यलोकातील एक रात्र होते.

ज्या ठिकाणचा दिवस व रात्र एवढी मोठी आहेत त्या काळात जे मरत नाही ते भाग्यवान हा दिवस पाहतात. ते स्वर्गातील चिरंजीव होत. देवराज इंद्राचीच दशा पाहा की, ब्रह्मदेवाच्या एका दिवसात चौदा इंद्र जातात. ब्रह्मदेवाच्या आठ प्रहरांना जे डोळ्याने पाहणारे आहेत त्यांना ‘अहोरात्र वेत्ते’ म्हणतात

ब्रह्मदेवाच्या दिवसाला प्रारंभ झाला म्हणजे अव्यक्तापासून सर्व व्यक्त वस्तू उत्पन्न होतात. रात्रीला प्रारंभ झाला म्हणजे त्याच अव्यक्त नामक वस्तूमध्ये पुन्हा लीन होतात.

हे अर्जुना! भूतांचा तोच हा समुदाय याप्रमाणे पुन्हा पुन्हा जन्मून पराधीन होऊन रात्र सुरू झाली की लय पावतो आणि दिवस सुरू झाला की जन्मतो. (ओवी १५६ ते १६९)

वाचक मित्रांनो, सध्याच्या वातावरणात भारतीय आध्यात्मिकता, संस्कृती परंपरा व गूढ तत्त्वज्ञानांची माहिती घेणे शक्य असेल तेवढे अन् तेव्हा घेतली पाहिजे. आपली क्षणभंगुरता व जीवन कळू शकण्यास मदत होईल.

## बोल्हेगाव येथे युवतीची गळफास घेऊन आत्महत्या

नगर – बोल्हेगाव उपनगरात एका युवतीने राहत्या घरात गळफास घेत आत्महत्या केली. गौरी रोहित नवसुपे (वय २५) असे आत्महत्या केलेल्या युवतीचे नाव आहे. ही घटना रविवारी (८ जून) रात्री उघडकीस आली. या प्रकरणी तोफखाना पोलीस ठाण्यात अकस्मात मृत्यूची नोंद करण्यात आली आहे. गौरी नवसुपे यांनी त्यांच्या राहत्या घरी छताच्या पंख्याच्या लोखंडी हुकास दोरी बांधून गळफास घेतल्याची माहिती मिळाली आहे.गंभीर अवस्थेत असलेल्या गौरी यांना त्यांचे नातेवाईक लक्ष्मण सुखदेव दुबे यांनी तत्काळ येथील जिल्हा शासकीय रूग्णालयात उपचारासाठी दाखल केले. मात्र, डॉक्टरांनी तपासणीनंतर उपचारापूर्वीच त्यांना मृत घोषित केले. या घटनेची माहिती डॉ. शिंदे यांनी तोफखाना पोलीस ठाण्याला दिली. पोलिसांनी अकस्मात मृत्यूची नोंद केली असून अधिक तपास महिला पोलीस अंमलदार प्रमीला गायकवाड करीत आहेत.

## श्रीमती कमलताई आकडे यांचे निधन



नगर – बागडपट्टी येथील रहिवासी श्रीमती कमलताई सोपानराव आकडे (वय ७६) यांचे १० जून रोजी आकस्मात निधन झाले. त्यांच्यावर नालेगाव अमरधाम येथे अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्या मागे १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. मंगेश आकडे यांच्या त्या मातोश्री होत.

## पत्रकार सुरेश रासकर यांचे अल्प आजाराने निधन



कोपरगाव – कोपरगाव येथील रहिवासी सुरेश दगडोबा रासकर (वय ७८) यांचे १० जून रोजी अल्प आजाराने निधन झाले. त्यांच्यावर कोपरगाव अमरधाममध्ये अंत्यसंस्कार करण्यात आले.

त्यांच्यामागे १ भाऊ, भावजय, पत्नी, १ मुलगा, १ मुलगी, सुन, जावई, नातवंडे असा परिवार आहे. दैनिक नवा मराठाचे संस्थापक, संपादक कै. आचार्य गुंदेचा यांच्याकडून त्यांनी पत्रकारितेचे धडे घेतले होते.

## ताराबाई शिंदे यांचे अल्पश: आजाराने निधन



श्रीरामपूर – येथील ताराबाई कौतिक शिंदे (वय ७५) यांचे अल्पश: आजाराने दुःखद निधन झाले.

त्यांच्या पश्चात दोन मुले, सुना, पुतणे, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

बांधकाम कारागीर संतोष शिंदे व आचारी रवि शिंदे यांच्या मातोश्री होत.

## तुकाराम सुद्रिक यांचे अल्प आजाराने निधन



कर्जत – हरणवस्ती, पोखर्डी, ता. कर्जत येथील रहिवासी तुकाराम ज्ञानदेव सुद्रिक (वय ६०) यांचे ९ जून रोजी अल्प आजाराने निधन झाले.

त्यांच्यावर पोखर्डी (ता.कर्जत) येथे अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे २ मुली, पत्नी, जावई, नातवंडे असा परिवार आहे.

## रस्त्यात रिक्षा उभ्या करुन वाहतूकीस अडथळा, पाच रिक्षाचालकांवर पोलिसांकडून गुन्हे दाखल

नगर – शहरातील माळीवाडा बस स्थानक, जिल्हा परिषद कार्यालयाच्या गेट समोर रस्त्याच्या मध्ये बेशिस्तपणे रिक्षा उभ्या करुन वाहतुकीस अडथळा निर्माण करणाऱ्या पाच रिक्षा चालकांवर कोतवाली पोलिसांनी कारवाई करत गुन्हे दाखल केले आहेत. ही कारवाई ९ जून रोजी दुपारी करण्यात आली.

माळीवाडा बस स्थानकाचे इन गेट आणि जिल्हा परिषदेचे गेट समोर रस्त्याच्या कडेला आणि रस्त्याच्या मध्ये रिक्षा उभ्या करुन रिक्षाचालक वाहतुकीस अडथळा आणून वाहतूक कोंडी करतात. कोतवाली पोलिस पेट्रोलिंग गस्त करीत असताना दुपारी या ठिकाणी रस्त्यामध्ये पेक्षा उभ्या करुन प्रवाशांना मोठमोठ्याने आवाज देताना रिक्षाचालक मिळून आले. यामध्ये महादेव दामोदर चेमटे (वय ३७, रा. निंबळक, निमगाव रोड, ता.नगर), राजेश पांडुरंग काकडे (वय ४१, रा. गणेश कॉलनी, बोल्हेगाव), गणेश जालिंदर आजबे (वय २३, रा सन फार्मा कंपनी जवळ पोलीस कॉलनी, बोल्हेगाव अ.नगर),ऋषिकेश भगवान कोकणे (वय २६, रा. बालिकाश्रम रोड, अ.नगर), राजेंद्र गहिनीनाथ हापसे (वय. ५२, मिलिंद कॉलनी, सावतानगर, भिंगार) यांचा समावेश आहे. याशिवाय यावेळी नवनाथ झुंबर पवार (वय ६०, रा. दूधसागर सोसायटी, मोहिनीनगर, केडगाव) हा त्याची बजाज कंपनीची रिक्षा ( क्र. एम एच १४ सी जी ३११५ ) भरधाव वेगात बेदरकारपणे चालवताना मिळून आला.

याप्रकरणी पोलीस कॉन्स्टेबल तोहसीन शेख यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन राजेश काकडे महादेव चेमटे गणेश आजबे ऋषिकेश कोकणे राजेंद्र हापसे यांच्याविरुद्ध बी एन एस कलम २८५ प्रमाणे आणि नवनाथ पवार यांच्याविरुद्ध बी एन एस कलम २८१ प्रमाणे गुन्हे दाखल केले आहे.

पुढील तपास पोलीस हवालदार विजय काळे हे करीत आहेत.



वटपौर्णिमेनिमित्त माळीवाडा देवकर गल्ली मधील पंचवटी परिसरातील वडाच्या झाडाला महिलांनी फेर्या मारुन पुजा केली. याप्रसंगी माजी महापौर सुरेखा कदम, सोनाली कदम, प्रतीक्षा सैंदाणे, रजनी कोथिंबिरे, शारदा जाधव, भारती कदम, मुक्ताबाई कदम, मंदा सौदागर आदिंसह महिला उपस्थित होत्या.



उपनगर येथे बालाजीमंदिर येथे महिला आघाडीच्या अध्यक्षा सौ.शिल्पाताई अशोकराव दुसुंगे यांच्या नेतृत्त्वात महिलांनी वड पौर्णिमा उत्साहात साजरी केली

## माळीवाडा परिसरातील महिलांनी वृक्षारोपणाने साजरी केली वटपौर्णिमा

नगर – वटपौर्णिमेनिमित्त माळीवाडा देवकर गल्लीमधील पंचवटी परिसरातील वडाच्या झाडाला महिलांनी फेऱ्या मारुन पुजा केली. याप्रसंगी माजी महापौर सुरेखा कदम, सोनाली कदम, प्रतीक्षा सैंदाणे, रजनी कोथिंबिरे, शारदा जाधव, भारती कदम, मुक्ताबाई कदम, मंदा सौदागर आदिंसह महिला उपस्थित होत्या.

यावेळी सौ.सुरेखा कदम म्हणाल्या कि, भारतीय संस्कृतीत सण, उत्सव हे आरोग्य रक्षण व निसर्गाशी समरस असे आहेत. या सगळ्यांचा विचार केल्यास आयुर्वेदिक परंपरेला चालना देणारे आहे. वटपौर्णिमेच्या दिवशी स्त्रीयांनी उपवास करावा, वृटवृक्षाचा सान्निध्यात रहावे, मैत्रिणीबरोबर हसत खेळत वेळ घालवावा. याच बरोबरच आध्यात्मिक कथेनुसार सती सावित्रीने यमदूताकडून आपल्या पतीचे प्राण परत आणले अशी अख्यायिका आहे. त्यामुळे आपल्या पतीच्या दीर्घाष्युसाठी व जन्मोजन्म हाच पती मिळावा, यासाठी वटपौर्णिमेचे व्रत केले जात आहे, हा सण आपल्या जीवनात आनंद घेऊन येणार असल्याचे सांगितले.

सौ.सोनाली कदम म्हणाल्या, सध्या ग्लोबल वार्मिंगचा धोका लक्षात घेता प्रत्येकाने वृक्ष लावले पाहिजे ही काळाजी गरज आहे. आपल्या सण–उत्सवातून निसर्गाचे महत्व विषद केले आहे. त्यामुळे निसर्ग संवर्धनासाठी प्रत्येकाने वृक्षारोपण केले पाहिजे. प्रत्येक महिलेने वटपौर्णिमेचे औचित्य साधून वृक्षारोपण करुन त्यांचे संवर्धन करावे, असे आवाहन केले.

## विळद शिवारात सशस्त्र दरोडा; मारहाणीत चौघे जखमी, रोकडसह दागिने दरोडेखोरांनी पळविले

*(पान १ वरुन)*

घुमट येथील रहिवासी असून मेंढपाळ आहेत. त्यांचा मेंढ्यांचा तळ विळद शिवारातील नारुंडी तलावाजवळ होता. फिर्यादी व इतर सर्वजण ९ जून रोजी रात्री जेवण करून मेंढ्यांच्या तळावर पालात झोपलेले होते. १० जून रोजी पहाटे १.२० च्या सुमारास काळे कपडे घातलेले ७ ते ८ अनोळखी दरोडेखोर हातात काठ्या व चाकू घेवून त्यांच्या तळावर आले. त्यांनी फिर्यादीला काठीने मारले असता त्यांनी त्यांच्या कडील कांबळ त्यातील एका दरोडेखोराच्या अंगावर फेकून प्रतिकार करण्याचा प्रयत्न केला.

तेव्हा दोघांनी त्यांना पकडले व एकाने त्यांच्या गळ्याला चाकू लावून आरडा ओरडा केल्यास जीवे मारण्याची धमकी दिली. त्यावेळी फिर्यादीच्या पत्नी जाग्या झाल्या व मदतीसाठी आरडा ओरडा करू लागल्या असता त्यांनाही दरोडेखोरांनी काठीने मारहाण करत चाकू दाखवून धमकी दिली. त्यानंतर तुमच्या जवळील पैसे व दागिने काढून द्या नाहीतर एकालाही जिवंत ठेवणार नाही अशी धमकी देत फिर्यादीची पत्नी शीतल होडगर, मेव्हणा लक्ष्मण सूळ, प्रकाश सूळ, सुमन सूळ यांना काठीने बेदम मारहाण करत चाकूने वार केले. तसेच त्यांच्याकडील ७० हजारांची रोकड, सुमारे पावणे तीन तोळ्याचे सोन्याचे दागिने असा १ लाख ५१ हजारांचा ऐवज घेवून तेथून पळून गेले.





विळद शिवारात दरोडेखोरांच्या मारहाणीत जखमी झाल्याने नगरच्या खाजगी रुग्णालयात उपचार घेणारे मेंढपाळ.

या मारहाणीत चौघे जखमी झाले. याबाबतची माहिती पोपट होडगर यांनी नगर तालुका बाजार समितीचे उपसभापती रभाजी सूळ यांना फोन करून सांगितल्यावर त्यांच्यासह पिंप्री घुमट येथून काही नागरिक घटनास्थळी गेले. रभाजी सूळ यांनी घटनेची माहिती एमआयडीसी पोलिसांना दिली. त्यानंतर स.पो.नि. माणिक चौधरी हे पोलिस पथकासह घटनास्थळी दाखल झाले. स्थानिक गुन्हे शाखेचे पथक, ठसेतज्ञ, श्वान पथकही घटनास्थळी गेले. त्यांनी पाहणी करून दरोडेखोरांचा तपास सुरु केला. मारहाणीत जखमी झालेल्या चौघांना उपचारासाठी नगरच्या खाजगी रुग्णालयात दाखल करण्यात आले आहे.

या प्रकरणी पोपट बन्सी होडगर यांनी दिलेल्या फिर्यादी वरून एमआयडीसी पोलिसांनी अज्ञात दरोडेखोरांच्या विरुद्ध बीएनएस २०२३ चे कलम ३१० (२), ३११ प्रमाणे दरोड्याचा गुन्हा दाखल केला आहे. पुढील तपास स.पो.नि. माणिक चौधरी हे करीत आहेत.

# गृहिणी

## आरोग्य

### डोळ्यांचा थकवा घालवा

डोळ्यांचा ताण ही एक सामान्य स्थिती आहे जी तुमच्या डोळ्यांच्या तीव्र वापरामुळे उद्भवते, जसे की वाचन, डिजिटल उपकरणे वापरणे किंवा लांब अंतरावर वाहन चालवणे. डोळ्यांच्या ताणाची इतर नावे म्हणजे डोळा थकवा आणि अस्थिनोपिया. डोळ्यांच्या ताणा मुळे अस्वस्थता निर्माण होऊ शकते. यावर उपाय म्हणून डोळ्यांचा थकवा घालवण्यासाठी गार पाणी खूप परिणामकारक असते. यामुळे डोळ्यांचे स्नायू पुन्हा उत्तेजित होतात. डोळ्यांवरची सूज कमी होते. त्यासाठी तोंडावर थोडे गार पाणी शिंपडावे. डोळे बंद करून ही कृती करावी. यामुळे थकलेल्या डोळ्यांना ताबडतोब आराम मिळतो. चांगल्या परिणाम ांसाठी एखादे मऊ कापड गार पाण्यात भिजवून ते डोळ्यांवर ठेवावे. एक मिनीट ही पट्टी डोळ्यांबर ठेवावी. गरज वाटल्यास ही कृती पुन्हा करावी. काही तुकडे स्वच्छ कापडामध्ये गुंडाळावेत आणि बंद डोळ्यांवर ते फिरवावेत. थोड्या वेळानंतर खूप आरामदायी वाटेल.

## पाककला

### मँगो टॉफी

**साहित्य :** हापूस आंबा रस ४ कप, साखर ३ कप, दूध पावडर २ कप, शुध्द तूप १ मोठा चमचा, ग्लुकोज पावडर १ कप.

**कृति :** आंबा रसात साखर पूर्णपणे विरघळून घ्या. दूध पावडर आणि ग्लुकोज पावडर एकजिनसी मिसळून घ्या. ही पावडर आंबा रसात मिसळा.

भांडे मंदाग्नीवर ठेवून ढवळत रहा. करपू देऊ नका. आटून आटून रसाचा गोळा होईपर्यंत करा. एका ताटाला आतून हलका तुपाचा हात चोळून त्यावर हा रसाचा गोळा पसरून थापा. थर जास्त जाड ठेवू नका. मिश्रण निवत आल्यावर त्याच्या वड्या कापून टॉफी बनवा.

## सौंदर्य

### त्वचा उजळण्यासाठी

* टोमॅटो आणि लिंबाचा रस तसेच दूध सममात्रेत एकत्र मिसळून त्वचेवर लावावे. यानंतर १५ मिनिटांनी स्नान करावे. याने त्वचेचे सौंदर्य वाढते.

* जर चेहऱ्यावर डाग असतील तर मुलतानी मातीत चंदन पावडर, चिमूटभर हळद व २-३ थेंब कापराचे तेल टाकून चेहऱ्यावर लेप लावल्यास हळूहळू डाग नाहीसे होतात.

* चेहर रुक्ष असेल तर २ चमचे ताजी मोहरी वाटून त्यात १ चमचा दूध व चिमूटभर हळद मिसळून पेस्ट बनवून लावा व १० मिनिटांनंतर चेहरा धुवा.

## वास्तू

* कार्यालयाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्याचा कक्ष हा सर्वात प्रथम वा सुरुवातीला असू नये, प्रवेशद्वाराजवळ एखाद्या अशा सहायकाचे टेबल असावे, जो व्हिजिटर्सना माहिती देऊ शकेल.

* लक्ष्मीची अवकृपा रहात असेल तर रोज स्नानानंतर लक्ष्मीची प्रतिमा वा नोटांसमोर कनकधारा स्तोस्त्राचा पाठ करावा. लाभ अवश्य होईल.

## सल्ला

साबण जास्त वाया जाऊ नये यासाठी फॉइल पेपर साबणाच्या खालच्या भागाला चिकटवा. साबण जास्त वाया जाणार नाही.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# दैनिक पंचांग

बुधवार, दि. ११ जून २०२५

**---, शके १९४७ विश्वावसुनामसंवत्सर, ज्येष्ठ शुक्लपक्ष, ज्येष्ठा २०।११, सूर्योदय ०६ वा. ३२ मि. सूर्यास्त ०५ वा. ४० मि.**

## राशिभविष्य

**मेष** : तुम्हाला तुमच्या आईची आठवण येऊ शकते. तुमचा तुमच्या कुटुंबातील सदस्यांसोबत काही वाद झाला असेल तर तोही आज संपेल.

**वृषभ** : आजचा दिवस विद्यार्थ्यांसाठी शैक्षणिक क्षेत्रात यश मिळवण्याचा असेल. ज्यामध्ये त्यांना त्यांच्या कुटुंबातील सदस्यांचेही पूर्ण सहकार्य मिळेल.

**मिथुन** : जे प्रेमसंबंधात आहेत त्यांना आज आपल्या जोडीदारासोबत बाहेर फिरायला जाण्याचा विचार करण्याआधी त्यांच्या कुटुंबातील सदस्यांची परवानगी घ्यावी लागेल

**कर्क** : आज संध्याकाळी तुम्ही तुमच्या कुटुंबीयांसह शुभकार्यात सहभागी होऊ शकता. आज गोड बोलून तुम्हाला कोणाशीही वाद असेल तर तो मिटवावा लागेल.

**सिंह** : आजच्या दिवशी तुमच्या बोलण्यातील गोडव्यामुळे तुम्ही नातेवाईकांसोबत पॅचअप करू शकता. ज्यामुळे कौटुंबिक ऐक्य वाढेल.

**कन्या** : कुटुंबातील एखाद्या व्यक्तीला आज सरकारी नोकरी मिळू शकते त्यामुळे कुटुंबातील सदस्यांमध्ये त्यांची प्रशंसा होईल.

**तूळ** : तुमच्या नातेवाईकांकडून मदत मागितली तर ती तुम्हाला सहज मिळेल. आज नोकरदार लोकांच्या बोलण्यात मृदुता आल्याने बॉस खूश होईल.

**वृश्चिक** : आजचा दिवस तुमच्या खर्चात वाढ करेल. तुमची इच्छा नसताना अनेक निष्फळ खर्च तुम्हाला करावे लागतील.

**धनु** : जोडीदाराला शॉपिंगसाठी बाहेर नेत असाल तर तुम्हाला तुमच्या खिशावर लक्ष ठेवून खर्च करावा लागेल. अन्यथा आर्थिक संकटाला सामोरे जावे लागेल.

**मकर** : तुमचे पैसे बुडू शकतात आणि तुमच्या जवळचा एखादा व्यक्ती तुमचा विश्वासघात करू शकतो.

**कुंभ** : नकारात्मक विचाराने तुमचे होणारे काम बिघडू शकते. अशावेळी तुम्ही मनाने योग्य निर्णय घेऊ शकणार नाही. मागील उधारी उसनवारी वसुल होईल.

**मीन** : तुमच्या कुटुंबातील कोणत्याही सदस्याचा सल्ला अवश्य घ्या. तसेच उत्साहाच्या भरात कोणताही निर्णय घेऊ नका. जुन्या मित्रांची अचानक भेट होईल.

**संकलक : ॲड. सौ. पूजा गुंदेचा**

# शब्दगंध क्र. ७१९६ सौ.शैलजा कुलकर्णी

| | | | | | | | |
|---|---|---|---|---|---|---|---|
| १ | २ | | ३ | ४ | ५ | ■ | ६ |
| ७ | | ■ | ८ | | | ९ | |
| | ■ | १० | | ■ | ■ | ११ | |
| ■ | १२ | | | | १३ | | ■ |
| १४ | | | | ■ | | ■ | १५ |
| १६ | | ■ | ■ | १७ | | १८ | |
| | ■ | १९ | | | ■ | २० | |
| २१ | | | ■ | २२ | | ■ | |

**आडवे शब्द :-** १) लहान गावाची व्यवस्था पाहणारी स्थानिक स्वराज्य संस्था ७) मासा; बारा राशींपैकी एक ८) दुर्दैवी; कपाळकरंटा १०) हात; हस्त; सारा; महसूल ११) भारताचा राष्ट्रीय पक्षी १२) हिंदी चित्रपटांतील एक आघाडीचा नायक १४) मनाला येईल तसे वागणे १६) सातारा जिल्ह्यातील एक तालुका ज्यात महाबळेश्वर हे थंड हवेचे ठिकाण आहे १७) परवानगीचे पत्र १९) नीट; अजिबात वाकडे नसलेले २०) तापलेल्या दुधावर येणारा पापुद्रा २१) नवविधा भक्तिपैकी एक २२) आठवण; स्मरण

**उभे शब्द :-** १) खेडेगावात राहणारे लोक २) सुखदुःख जाणणारे इंद्रिय; माइंड ३) नोकरी करून उपजीविका करणारा ४) मृत्युदेव ५) शरीर; देह; काया; कुडी ६) धीट; निश्चयी; पक्का ९) मुस्लिम पुरुषाचे एक नाव १०) मुसलमानी धर्मसूत्र १२) मंगलप्रसंगी वाजविले जाणारे एक वाद्य १३) मातीच्या भांड्याचा फुटका तुकडा १४) मऊपणा; मृदुता; नरमाई १५) गणपतीचे एक नाव १७) तांबडी फुले येणारा एक वृक्ष १८) सरळसोट लांब लाकूड किंवा बांबू १९) वर्ष; साल; शक

### शब्दगंध क्र. ७१९५ चे उत्तर



# * * * * * * मुलांचे विश्व * * * * * *

: संकलक : ॲड.सौ. पूजा गुंदेचा

**सुविचार** : माता ही पृथ्वीपेक्षाही महान आहे.

# मुलांसाठी भन्नाट माहिती ज्ञानरंजन

## काही जण रंगाने गोरे, तर काही जण काळे का असतात?

माणसाच्या रंगावर काही अवलंबून नसते. हे खरे असले, तरी काळ्या रंगाच्या लोकांना गोऱ्या व्यक्ती सुंदर वाटत असतात; तर गोऱ्या व्यक्तींना काळे लोक तरतरीत, स्मार्ट वाटत असतात. एकूण काय स्वतःजवळ जे आहे, त्यापेक्षा दुसऱ्याकडचे जास्त आवडणे हा माणसाचा स्वभाव आहे. पण काहीजण गोरे का असतात आणि काही जण काळे का असतात, हा प्रश्न तुम्हाला नक्कीच पडला असेल. विशेषतः एकाच आईच्या पोटी जन्म घेणाऱ्या दोन मुलांचे रंगही वेगळे असतात, हे तुम्ही पाहिलेच असेल. असे का? ते आता समजून घेऊ.

त्वचेची रचना दोन थरांमध्ये असते. यातला वरचा किंवा बाहेरचा थर (बाह्यत्वचा) पेशींच्या पाच थरांनी बनलेला असतो. यापैकी सर्वात खालच्या पेशीथरातून पेशी सतत निर्माण होत असतात व त्या हळूहळू वर सरकतात. या बाह्यत्वचेमध्ये रक्तपुरवठा किंवा मज्जातंतू नसतात. पोषण आणि संवेदना या दोन्हींसाठी त्याला खालच्या थरावर अवलंबून राहावे लागते. बाह्यत्वचेच्या पेशीथरांमध्ये मेलॅनीन नावाचे रंगद्रव्य असते. मेलॅनोसाईट नावाच्या पेशीपासून संप्रेरकाच्या नियंत्रणाखाली या द्रव्याची निर्मिती होत असते. मेलॅनिनचे प्रमाण हे आनुवंशिकता, वातावरण, स्त्री-पुरुष भेद, वय इ. विविध गोष्टींवर अवलंबून असते. आणि या रंगद्रव्याच्या प्रमाणावरूनच त्वचेचा काळे-गोरेपणा ठरतो. त्यामुळे निग्रोंची मुले सामान्यतः काळ्या रंगाची असतात. उन्हात काम करणारे लोक काळवंडतात, तर शरीराच्या ज्या भागाला ऊन लागत नाही तो भाग इतर भागांपेक्षा उजळ दिसतो. लहान मुले वयस्करांपेक्षा जास्त गोरी दिसतात. ''आमचा राहुल लहानपणी फारच गोरापान होता हो, आताच काळवंडलाय...'' असं तुमची आई म्हणते ते खरेच असते! अर्थात त्वचेचा रंग मुख्यत्वे मेलॅनीनमुळे ठरत असला, तरीही इतर दोन रंगद्रव्येही यासाठी महत्त्वाची असतात. एक म्हणजे त्वचेखालच्या चरबीतले पिवळे द्रव्य-कॅरोटीन आणि दुसरे म्हणजे त्वचेच्या रक्तप्रवाहातील हिमोग्लोबीन हे रक्तद्रव्य. यावरून तुमच्या लक्षात आले असेल की, आपला रंग मेलॅनीन, कॅरोटीन व हिमोग्लोबीन या तीन द्रव्यांवरून ठरतो.

## शरीर हीच संपत्ती

एका मोठ्या शहरात एक श्रीमंत व्यक्ती राहत होता. त्यांच्याकडे भरपूर पैसा होता आणि नुकतेच त्याने शहरात एक मोठे घर घेतले होते. त्याच्याकडे धनसंपत्ती तर भरपूर होती. परंतु शरीराने तो अतिशय दुबळा व अस्वस्थ होता.

तो दिवस-रात्र मेहनत करून पैसे कमावित असे. परंतु आपल्या शरीराकडे लक्ष द्यायला त्याच्याकडे वेळ नव्हता. हळू हळू तो खूप श्रीमंत झाला परंतु त्याला अनेक रोगांनी विळखा घातला.

तो व्यक्ती स्वार्थी नव्हता, परंतु त्याच्याकडे आपला पैसा खर्च करण्यासाठी वेळ नव्हता त्याला जणू पैसे कमावण्याची सवयच लागली होती. त्याला डॉक्टरांकडे जाण्यासाठी वेळच मिळत नसे. शरीराकडे लक्ष न दिल्याने हळूहळू त्याचे शरीर कमजोर व्हायला लागले.

एक दिवस कामावरून थकून तो घरी आला. आज त्याचे डोके खूप दुखत होते, म्हणून तो सरळ आपल्या रूममध्ये जावून झोपून गेला. जेव्हा त्याच्या नोकराने त्याला जेवायला विचारले तेव्हा भूक नाही म्हणून, त्याने जेवायला नाही म्हटले.

अर्ध्या रात्री त्याचे डोक्यात अतिशय वेदना व्हायला लागल्या. त्याला काहीही लक्षात येत नव्हते. अचानक त्याच्या समोर त्याच्याच आकाराएवढी एक आकृती उभी राहिली. ती आकृती म्हणाली, ''मी तुझी आत्मा आहे आणि आज मी तुझे शरीर सोडून जाणार आहे.''

तेव्हा तो माणूस भित भित म्हणाला, ''तू माझ्या शरीराला का सोडत आहे? माझ्याकडे भरपूर पैसा आहे व मी माझे संपूर्ण आयुष्य मेहनत केली आहे. मी एवढ्या विशाल घरात राहतो, की या घरात राहण्याची आणि अनेक जण फक्त स्वप्नेच पाहतात.''

आत्मा म्हणाली,

''माझी गोष्ट ऐक, तुझे हे मोठे घर माझ्या काहीही कामाचे नाही. माझे घर तर तुझे शरीर आहे. जे दिवसेंदिवस कमजोर होऊन, अनेक रोगांनी ग्रसीत झाले आहे. तू कल्पना कर अनेक वर्षे तुटलेल्या झोपडीत राहण्याची. बस त्याच पद्धतीने तू माझी हालत केली आहे आणि आता मी या घरात अधिक काळ राहू शकत नाही. एवढे बोलून आत्मा त्या शरीराला सोडून निघून गेली.''

**तात्पर्य :** शरीर व चांगले स्वास्थ्य ही सर्वात मोठी संपत्ती आहे.



# जीवन का अमृत (भाग १)

## सामाजिक आचरण और नैतिक जीवन

मानसिक रुप से उग्र हो जाते हैं। कुछ लक्षण बताते हैं कि व्यक्ति का आज्ञा चक्र दूषित हो गया है। गुस्से में चीजे फेंकना। खतरनाक तरीके से लटकते -कूदते पेड़ पर चढ़ते और उतरते हैं। ऐसी हरकतें वे अक्सर बचपन में बहुत करते हैं। घर में तोड़ फोड़ करना। अपने मां-बाप को पीटना या उन से जबान लड़ाना। एक कार्य कर रहे हैं और किसी ने बताया अमुक कार्य कमाई वाला है तो उसे छोड़ कर दूसरे कार्य करने लग जाना और कार्य पर कार्य बदलते रहना। दूसरे की बात खत्म होने से पहले ही उसे बीच में ही रोक कर अपनी बात कहना आरम्भ कर देना। अपनी बारी का इंतजार नहीं करना। किसी कार्य के लिये लाइन लगी हो तो वह उसे तोड़ेगा। सवाल पूरा होने से पहले ही उस का उतर बता देना। अक्सर ज्यादा बात करना। जोर जोर से ताली मार मार कर हंसना। एक जगह बैठे रहने में दिक्कत होना। धैर्य नहीं रखना। अत्यधिक छटपटाहट। कामयाबी ना मिलने पर संसार को गाली देना। सब भ्रष्ट हैं। धोखेबाज हैं। रिश्वतखोर हैं। अक्सर व्यक्ति उतावला रहता है। वह मशीन की तरह काम करता रहता है। दूसरों के काम में रुकावट डालता है या काम बिगाडने में उसे मजा आता है।

ऐसे व्यक्ति तरह तरह के अपराध करते हैं, कुकृत्य करते हैं, नशे करते हैं, चोरी करते हैं, चरित्रहीनता के कार्य करते हैं। कठोर दिल व्यक्ति, निर्दयी व्यक्ति, अत्याचारी व्यक्ति, फूट डालो और राज करो के स्वभाव वाले व्यक्ति। सामंतवादी सोच के व्यक्ति, डिक्टेटर सोच के व्यक्ति। ऐसे लोग मन में हीनता महसूस करते हैं। मुंह के मीठे और अन्दर से खोटे। ऐसे लोग किसी को नहीं छोड़ते सिर्फ वह अपना उल्लू सीधा करते हैं। उपरोक्त त्रुटियों के पीछे कई कारण देते हैं, परंतु असली कारण यह है कि हरेक व्यक्ति दूसरे का अटेन्शन चाहता है, प्यार चाहता। जब उसे यह नहीं मिलता है तब वह ऐसे कामों पर

उतारू हो जाते हैं वह दूसरे लोगो से या दूसरे लोग, जो उन के जन्म से साथ थे, से टकराने लगे और टकराते टकराते उनका आज्ञा चक्र अपनी धुरी से हिल गया, जिस के परिणाम स्वरूप व्यक्ति में तरह तरह के दोष आ जाते हैं।

ऐसे व्यक्ति डांटने या सजा देने से नहीं बदलते। ऐसे लोगों को केवल प्यार से बदल सकते हैं। उन्हे मन में प्यार देते रहो। प्यार जानवर को भी बदल देता है। ऐसे व्यक्ति को अगर कोई एक भी अटेन्शन

(क्रमशः)

**(कृपाल आश्रम, अहिल्यानगर)**

# अंतरिक बल (भाग - २)

ये लक्षण बताते हैं कि आज्ञा चक्र का एनर्जी लेवल कम हो गया है। अगर आप भूखे हैं तो उस स्थिति में कोई फ्रूट, जूस या फल आदि ले लेंवे। पांच-सात मिनिट घर में इधर उधर टहल लें। मन में सोचते रहें मैं चुस्त हूं खुश हूं शक्तिशाली हूं। टी.वी. आदि चल रहा हो या कोई बात कर रहा है उनसे थोड़ा दूर चले जायें ताकि वह ध्यान भटका ना सकें। अक्सर हमें यह महसूस होता है कि दिमाग में कई तरह के सवाल उठ रहे हैं, यह काम पहले करूं या वह काम करूं और कोई पुस्तक पढ़ रहे हो तो बार बार पीछे पेज देखते हैं कि कितने रह गये हैं। हम ऊबने लगते हैं। ये भी कमजोर चक्र की निशानी है। दिमाग काम करते करते थक जाता है। कोई भी विषय पर दिमाग ४०

मिनिट तक सही काम करता है। अगर आप विद्यार्थी हैं तो हर घंटे बाद विषय बदलते रहें। अगर आप योगी हैं तो लगातार योग नहीं करो। कभी योग करो कभी सेवा करो कभी स्थूल काम करो।

## आज्ञा चक्र

कभी सभी को मनसा सकाश दो। सब कुछ छोड़ कर साधना करते हैं परंतु मन नहीं लगता। खुशी लगातार कम हो रही है, साधना वा पढ़ाई में मन नहीं लग रहा हो। पराजय वादी विचार धारा मन में उठ रही हो। किसी भी चीज में मन ना टिक रहा हो। बस ईजत बचाने लिये आ रहे हैं। यह सब लक्षण हैं कि आप का आज्ञा चक्र कमजोर हो गया है। यह दर्शाता है कि आप के भोजन में अशुद्धि है तथा संग दोष या दृष्टि दोष से पीड़ित हैं।

किसी समस्या में उलझने के कारण मन की शक्ति कम हो गई है जिस से आज्ञा चक्र रोगी हो गया है। मन को किसी काम में बिजी रखें। मन से लोगों को तरंगे भेजें। किसी अच्छी पुस्तक को पढ़ते रहें। पढ़ना सब से बढ़िया काम है। इसलिये लक्ष्य रखें जब तक खुशी ना आयें तब तक पढ़ते रहना है। अव्यक्त मुरली की पुरी पुस्तक पढ़ दो। मन में सिमरण करते रहने से, अच्छे वाक्य दोहराते रहने से, अच्छी पुस्तकें पढ़ते रहने से, दूसरों को तरंगे देते रहने से दिमाग के उस भाग पर जो एकाग्रता, यादाश्त और सजकता से सम्बन्ध रखता है, बहुत अच्छा प्रभाव होता है। उस हिस्से की मोटाई बढ़ जाती है। उम्र के साथ यह हिस्सा सिकुड़ने लगता है। अगर हम ध्यान लगाते हैं तो यह सिकुड़न कम हो जाती है। सजकता और प्रदर्शन बढ़ जाता है। आज्ञा चक्र सक्रिय हो जाता है।

आज्ञा चक्र - ६- दोषपूर्ण -

दुनिया की हर चीज गोल है। प्रत्येक ग्रह अपनी धुरी पर घूम रहा है। आत्मा भी गोल गोल एक प्रकाश का बिंदू है। यह भी पीनियल ग्रंथि के अन्दर घूमती रहती है। बुरे कर्मों और बुरी सोच से अपनी धुरी से हिल जाती है। जिस से तरह तरह के रोग लग जाते हैं। वह

(क्रमशः)

**(प्रजापिता ब्रम्हाकुमारी ईश्वरीय विश्व विद्यालय)**

# हसा आणि शतायुषी व्हा!

**काकू :** अरे तुम्हाला किती वेळा सांगितलं इथे खेळू नका

**पिंटू :** आम्ही मोजलं नाही काकू...

**शिक्षिका :** मुलांनो सांगा पाहू, पृथ्वी का फिरते

**मुले :** बाई जरा खात पीत जावा तुम्हाला चक्कर आली असेल

# करुया स्पर्धा परिक्षांची तयारी

* १२९ वे घटनादुरुस्ती विधेयक २०२४ लोकसभेत कोणी मांडले?

– अर्जुन मेघवाल

**– अरविंद ब्राम्हणे,** भिंगार मो. ९४०३७३४२८१

# आयुर्वेदीय बालसंस्कार

## बालकांचे आजार

नस्य करण्यासाठी वातविध्वंसचूर्ण दोन्ही नाकपुड्यांत टाकावे किंवा पिंपळी, कुष्ठ, सैंधव, भरंगी यांचे समभाग चूर्ण घेऊन त्याने नस्य करावे.

* शिग्रुपत्रस्वरस, निर्गुंडी तेल नाकामध्ये दोन थेंब टाकावेत.

* करंजादीयोग याचे नस्य द्यावे.

* मन:शिला, वेखंड, सैंधव, शिग्रबीज, पिंपळी, हिंग, मोहरी, रक्तचंदन व गुग्गुळ यांचे धूपन करावे.

* श्वासकुठार रस मधात मिसळून त्याने डोळ्यांत अंजन करावे.

* झटका कमी झाल्यावर बालकाला पूर्ण विश्रांती द्यावी. त्यानंतर गरम पाण्यान स्वच्छ जबाळा घालावी. त्यानंतर त्याला ताजे गरम अन्न खाण्यास द्यावे.

* बालकाला नियमितपणे वेखंडघृत, पंचगव्यघृत, अश्वगंधादीघृत द्यावे.

* बालकाला वातविध्वंस, समीरपन्नग, स्मतिसागर कल्प तज्ज्ञ आयुर्वेदिक वैद्याच्या सल्ल्याने सुरू करावे.

* बालकाला आधुनिक उपचार बालरोग चिकित्सकांच्या मार्गदर्शनाने सुरू करावेत.

* झटके येणे ही अवस्था दुर्लक्ष करण्यासारखी नसल्यामुळे वेळीच उपचार सुरू करावेत.

फक्क ही बालकातील कुपोषणजन्य व्याधी असून, यात अस्थिवहस्रोतस दृष्टी असते. यामध्ये बालकाच्या विकासाची गती मंदावते.

बालक एक वर्षाचे होऊनही जर आपल्या पायावर उभे राहू शकत नसेल व चालू शकत नसेल, तर त्या बालकाला फक्क म्हणजेच रिकेट्स हा आजार झाला आहे असे समजावे. याचाच अर्थ बालकाचे अस्थिवहस्रोतसाचे पोषण झालेले नसते. सामान्यत: बालकांची (अस्थि) हाडे एक वर्षापर्यंत मजबूत होतात व बालक आपल्या पायावर उभे राहू शकते व चालू शकते.

**(क्रमश:)**

**डॉ. शारदा निर्मळ-महांडुळे**

दुर्वांकुर वंध्यत्व निवारण व गर्भसंस्कार सेंटर अहिल्यानगर

मोबाईल नं- ८७९३४००४००



लंडन येथील ट्रीनिटी कॉलेजच्या वतीने घेण्यात आलेल्या थेअरी ऑफ म्युझिक ग्रेड १ संगीत परिक्षेत यश मिळविलेले नगरमधील ग्रेस म्युझिक अ‍ॅकॅडमीचे विद्यार्थी.

# आंतरराष्ट्रीय थेअरी ऑफ म्युझिक संगीत परिक्षेत ग्रेस अ‍ॅकॅडमीचे यश

नगर – लंडन येथील ट्रीनिटी कॉलेजच्या वतीने घेण्यात आलेल्या थेअरी ऑफ म्युझिक ग्रेड १ संगीत परिक्षेत नगरमधील ग्रेस म्युझिक अ‍ॅकॅडमीच्या विद्यार्थ्यांनी यश मिळविले. यात अभिषेक पोळ (९८/१००), ईशा बब्र्वे (९७/१००), अँरन पंडीत (९६/१००), अँजेलो थोरात (९६/१००), ओंकार राऊत (९६/१००), ओजस राऊत (९४/१००), शलमोन पहिलवान (८७/१००), आशिता लोखंडे (८४/१००) यांनी या परिक्षेत गुणवत्तापूर्वक यश संपादन केले.

याप्रसंगी पिटर पंडीत म्हणाले, संगीताला भाषा, देश, प्रांत नसतो. एक अविट आनंद देणारे संगीत सर्वांनाच भावत असते. संगीत साधनेतून निर्माण होणाऱ्या या कलेत आंतरराष्ट्रीय स्तरावरील परिक्षेत विद्यार्थ्यांनी मिळविलेले यश हे कौतुकास्पद असेच आहे. परिक्षेतील सहभागामुळे देश–विदेशातील संगीताचे ज्ञान वाढण्यास मदत झाली. त्यात मिळविलेल्या यशामुळे विद्यार्थ्यां मधील आत्मविश्वास वाढला असल्याचे सांगितले. या परिक्षेत सहभागी होण्यासाठी किंवा अधिक माहितीसाठी ग्रेस म्युझिक अ‍ॅकॅडमी डॉन बॉस्को कॉलनी, कॉटेज कॉर्नर जवळ, सावेडी, अहिल्यानगर येथे किंवा ९५११२२४७९४/९८९०९७८९९७ या क्रमांकावर संपर्क करावे, असे आवाहन पिटर सर व सोनाली मॅडम यांनी केले आहे.

# आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ व गुणे शास्त्री आयुर्वेद महाविद्यालयाच्या अध्यक्षपदी सचिन अरुणकाका जगताप यांची सर्वानुमते नियुक्ती

नगर – आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळ व गंगाधरशास्त्री गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे अध्यक्षपदी संस्थेचे सहसचिव सचिन अरुणकाका जगताप यांची सर्वानुमते निवड करण्यात आली आहे. आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाच्या संचालक मंडळाची नुकतीच बैठक झाली. या बैठकीत संस्थेचे मानद सचिव डॉ.विजय भंडारी यांनी संस्थेच्या अध्यक्ष पदासाठी सचिन जगताप यांच्या नावाची सूचना केली. त्यास संचालक अरविंद शिंदे व अनिल मुरकुटे यांनी अनुमोदन दिले. यावेळी उपस्थितांनी अरुणकाका जगताप यांच्या प्रतिमेस जड अंत:करणाने आदरांजली वाहिली.



आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाच्या अध्यक्षपदी सचिन जगताप यांची नियुक्ती झाल्यावर त्यांचा सत्कार करताना संस्थेचे मानद सचिव डॉ.विजय भंडारी. समवेत उपाध्यक्ष आ.संग्राम जगताप, अरविंद शिंदे, अनिल मुरकुटे, ज्ञानदेव पांडूळे, सुभाष घोडके, रत्नाकर कुलकर्णी, ठाकूर नवलानी, डॉ.एस. एस. व्हावळ, ज्ञानेश्वर रासकर, वैशाली ससे, प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे, उपप्राचार्य डॉ.सुरजसिंह ठाकूर, प्रतिभा भारदे व परिमल निकम.

यावेळी आयुर्वेद शास्त्र सेवा मंडळाचे उपाध्यक्ष आ.संग्राम जगताप, संचालक ज्ञानदेव पांडूळे, सुभाष घोडके, रत्नाकर कुलकर्णी, ठाकूर नवलानी, डॉ.एस. एस. व्हावळ, ज्ञानेश्वर रासकर, वैशाली ससे, गुणे आयुर्वेद महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ.दत्तात्रय लोडे, उपप्राचार्य डॉ.सुरजसिंह ठाकूर, संस्थेच्या व्यवस्थापिका प्रतिभा भारदे, परिमल निकम आदी उपस्थित होते.

यावेळी सचिन जगताप म्हणाले, अरुणकाकांनी सर्वात जास्त वेळ या संस्थेच्या प्रगतीसाठी दिला. घराकडे न बघता समाजातील सर्व घटकातील नागरिकांचे प्रश्न सोडवण्यासाठी तसेच जिवलग मित्रांसाठी त्यांनी भरपूर वेळ दिला. या संस्थेच्या माध्यमातून त्यांनी जे कामसूरू केले ते मी पुढे नेणार आहे. हे पद सांभाळणे व स्व.काकांची भूमिका निभावणे सोपे नाहीये. तुमच्या सर्वांच्या आशीर्वादाने व सहकार्याने ही जबाबदारी पेलणार आहे.

आ.संग्राम जगताप म्हणाले, देवचके परिवाराने मोठ्या विश्वासाने ही संस्था ३४ वर्षांपूर्वी काकांच्या हातात सोपवली. काकांनीही या संस्थेवर मुलाप्रमाणे प्रेम करत मोठी प्रगती केली आहे. त्यांच्या निधनाने या संस्थेची मोठी हानी झाली आहे. आता सचिन जगताप हे या संस्थेचे अध्यक्ष झाले आहेत. सचिन जगताप हे उपक्रमशील व सर्जनशील आहेत. त्यांन सर्व क्षेत्रांचे ज्ञान असल्याने ही संस्था ते योग्य पद्धतीने सांभाळतील. स्व.अरुणकाकांप्रमणे जरी आपण काम करू शकत नसलो तरी करण्याचा प्रयत्न करू.

डॉ.विजय भंडारी म्हणाले, गुणेशास्त्रींनी लावलेल्या या झाडाचा अरुणकाकांच्या काळात वटवृक्ष झाला आहे. त्यांच्या पश्च्यात सचिन व संग्राम जगताप हे बंधू संस्था चालवण्यास सक्षम आहेत. जसे काकांना सर्वांनी कायम सहकार्य केले तसेच आता या दोघांनाही सहकार्य करू.

संस्थाच्या व्यास्थापिका प्रतिभा भारदे यांनी आभार मानले.

# बुद्धिबळामुळे विचारशक्ती आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होतो

## आमदार संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा उत्साहात

नगर – बुद्धिबळ हा खेळ केवळ मनोरंजनासाठी नसून, विद्यार्थ्यांच्या एकाग्रता, कल्पकता, आणि निर्णयक्षमता वाढवणारा महत्त्वाचा मार्ग आहे. आजच्या स्पर्धात्मक युगात मुलांनी शैक्षणिक प्रगतीसोबतच मानसिक विकासासाठी अशा बुद्धिमान खेळांकडे वळणे आवश्यक आहे. बुद्धिबळामुळे विचारशक्ती, संयम, आणि आत्मविश्वास वृद्धिंगत होतो. आपल्या जिल्ह्यातून उद्याचे ग्रँड मास्टर तयार व्हावेत यासाठी आम्ही सर्वतोपरी प्रयत्न करू, असे उद्घाटनप्रसंगी आमदार संग्राम जगताप यांनी खेळाडूंना मार्गदर्शन करताना सांगितले.



जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा उत्साहात झाल्या.

जिल्हा बुद्धिबळ संघटनेच्या वतीने ११ वर्षांखालील मुला–मुलींकरिता आयोजित जिल्हास्तरीय बुद्धिबळ निवड चाचणी स्पर्धा ८ जून रोजी शांती ज्युनियर्स प्रि–स्कूल, प्रोफेसर चौक, सावेडी येथे यशस्वीरित्या पार पडली.

या स्पर्धेचे प्रास्ताविक जिल्हा बुद्धिबळ संघटनेचे यशवंत बापट यांनी केले. स्पर्धेचे उद्घाटन आमदार संग्राम जगताप यांच्या हस्ते झाले.

स्पर्धेत एकूण ५० खेळाडूंनी सहभाग घेतला. यामधून निवड झालेल्या पोरवाल दर्श, कटारिया विहान, कु. साबळे आरोही आणि कु. शिक्रे अभिशिक्ता हे खेळाडू पुणे येथे होणाऱ्या राज्यस्तरीय बुद्धिबळ स्पर्धेत जिल्ह्याचे प्रतिनिधित्व करणार आहेत.

यावेळी माजी नगरसेवक संजय शेंडगे, श्याम नळकांडे आणि सचिन शिंदे यांनी स्पर्धेस सदिच्छा भेट देत उपस्थित खेळाडूंना प्रोत्साहन दिले.

स्पर्धेच्या यशस्वी आयोजनासाठी शांती ज्युनियर्स प्रीस्कूलच्या वतीने अनिकेत कवाष्टे व तनुज रासने यांनी संयोजनाची जबाबदारी पार पाडली. कार्यक्रमाच्या यशस्वितेसाठी यशवंत बापट, पारुनाथ ढोकळे, गुजराथी सर, जोशी सर, प्रशांत धंगेकर, वैभव वाघ, देवेंद्र वैद्य, चेतन कड, कांबळे सर, देवेंद्र ढोकळे, कुद्रे सर, श्रीमती अनुराधा बापट आणि मनिष जसवानी यांनी सहकार्य केले.

# विष्णू व सौ. सोनाली अवचार यांची दुबईला अभ्यास दौऱ्यासाठी निवड

## भारतीय आयुर्वेदिक फूड सप्लिमेंटचा करणार प्रचार–प्रसार



नगर – दुर्धर आजारांवर रामबाण उपाय ठरणाऱ्या आयुर्वेदिक फूड सप्लिमेंटचा प्रचार–प्रसार करणारे विष्णू शिवाजी अवचार व सौ. सोनाली विष्णू अवचार यांची दुबईला अभ्यास दौऱ्यासाठी निवड करण्यात आली आहे. या दौऱ्यात ते भारतीय आयुर्वेदिक फूड प्रॉडक्टचा प्रचार–प्रसार करणार आहेत.

रियांश मल्टिट्रेड कंपनीच्या वतीने अवचार दांम्पत्यांना सहा दिवसाठी अभ्यास दौऱ्यासाठी पाठविण्यात येणार असल्याची माहिती व्यवस्थापकीय संचालक मधुकर जाधव व दत्ताजी मांडे यांनी दिली. विष्णूलक्ष्मी प्रसाद फाउंडेशन संचालिका सोनाली व विष्णू अवचर (रा. राळेगण थेरपाळ ता. पारनेर) या गेल्या ३३ महिन्या पासून रियांश मल्टिट्रेड कंपनीच्या माध्यमातून ३३ महिन्यात ६० हजारांपेक्षा अधिक गरजू लोकांना कंपनीचे आयुर्वेदिक फुड सप्लिमेंट उपलब्ध करुन दिले. या आयुर्वेदिक उत्पादन विविध आजारांवर नवसंजीवनी देणारे ठरले आहे. अवचर यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्रात २ हजार पेक्षा अधिक युवक–युवती कार्यरत आहेत. रियांशचे अमृत ज्युस औषध म्हणून अनेकांना वरदान ठरत असून, या आयुर्वेदिक उत्पादनांचा प्रचार–प्रसार देशाबाहेर सुरु करण्यात आले.



अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशनच्या अध्यक्षपदी सबाजीराव महादू गायकवाड यांची अध्यक्षपदी तर व्हाईस चेअरमनपदी अल्लाउद्दीन सिराजुद्दीन काझी यांची निवड करण्यात आली.

# पतसंस्थांचे सहकारी फेडरेशनच्या अध्यक्षपदी सबाजीराव गायकवाड

## व्हाईस चेअरमनपदी अल्लाउद्दीन काझी यांची निवड

नगर – अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशनच्या अध्यक्षपदी सबाजीराव महादू गायकवाड यांची अध्यक्षपदी बिनविरोध निवड करण्यात आली. तसेच व्हाईस चेअरमनपदी अल्लाउद्दीन सिराजुद्दीन काझी यांची निवड करण्यात आली आहे.

अहमदनगर जिल्हा पतसंस्थांचे सहकारी फेडरेशनच्या पंचवार्षिक निवडणूक गेल्या महिन्यात बिनविरोध पार पडली. या पार्श्वभूमीवर चेअरमन व व्हाईस चेअरमन निवडीची प्रक्रिया निवडणूक अधिकारी व्ही. के. मुटकुळे व पालवे यांच्या अध्यक्षतेखाली ९ जून रोजी संस्थेच्या कार्यालयात झाली. यावेळी गायकवाड यांची अध्यक्षपदी तर व्हाईस चेअरमनपदी काझी यांची निवड करण्यात आली. नवनिर्वाचित चेअरमन व व्हाईस चेअरमन यांचा मुटकुळे व पालवे यांच्या हस्ते सत्कार करण्यात आला. याप्रसंगी संस्थेचे संचालक रवींद्र बोरावके यांची देशाच्या सर्व राज्यांना वीज पुरवठा नियंत्रण करणाऱ्या ग्रीड इंडिया डायरेक्टरपदी निवड झाल्याबद्दल संस्थेच्या वतीने त्यांचा सत्कार करण्यात आला.

याप्रसंगी संचालक प्रशांत गायकवाड, प्रकाश सदाफुले, अर्चना म्हस्के, ज्योती गोलेकर, अशोक राशिनकर, विठ्ठल अभंग, रवींद्र बोरावके, शिवाजीराव कपाळे, नितीन चासकर, धनंजय गाडेकर, अशोक थोरे आदी उपस्थित होते.

# अहिल्यानगर शहरामध्ये १५ जून रोजी पालकांसाठी तज्ज्ञांचा मोफत खुला संवाद

### पास अकॅडमीचा अभिनव उपक्रम



सोमनाथ घार्गे (आयपीएस) | नयना डिन्नी | प्रा. डॉ. आश्लेषा भांडारकर | आर. जे. चैत्राली जावळे

नगर – गेल्या दोन वर्षांपासून शैक्षणिक क्षेत्रात कार्य करणाऱ्या पास अकॅडेमी तर्फे पालकांसाठी मोफत कार्यशाळेचे आयोजन केले आहे. बदललेल्या सामाजिक परिस्थितीमुळे व Social Media च्या अती वापरामुळे पालकांना व विद्यार्थांना विविध अडचणींना सामोरे जावे लागत आहे. त्यामुळे कौटुंबिक, सामाजिक व शालेय संगोपनात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी तसेच पाल्य आणि पालक यांच्यातील संबंध घट्ट होण्यासाठी पास अकॅडमीने या क्षेत्रातील तज्ज्ञांशी खुला संवाद आयोजित केला आहे. सदर The Growing Years हा कार्यक्रम १५ जून रोजी संध्याकाळी ५.३० वा. माऊली सभागृहात आयोजित केलेला आहे. या कार्यक्रमात आचार–विचारात सकारात्मकता आणने, अभ्यासात रुची वाढवणे, अवधानाचे केंद्रीकरण करणे, आंतरक्रियेतून अध्ययन इ. सकारात्मक विषयांवर व मुलांमध्ये वाढत चाललेल्या मोबाईलचे व्यसन, मुलांकडून पालक व शिक्षकांचा अवमान, विद्यार्थांची बेशिस्त, गैरवर्तन, न ऐकणे, अभ्यासाकडे दुर्लक्ष, अंधानुकरण, खाद्य संस्कृतीतील बदल इ. विषयांवर तज्ञ थेट पालकांशी खुला संवाद साधणार असून अनेक प्रश्नांची उकल करणार आहेत.

Cyber Crime, विद्यार्थ्यांतील गुन्हेगारी, इ. विषयांवर अहिल्यानगर जिल्ह्याचे पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे (IPS) समुपदेशन करणार आहेत. त्यांनी भावनिक बुद्धिमत्ता या विषयावर अनेक प्रशिक्षण शिबीर घेतली आहेत. तसेच देशभरात ५०० हून अधिक पोलिसांना भावनिक बुद्धिमत्तेचे प्रशिक्षण दिलेले आहे. त्यांच्या या अनुभवाचा फायदा पालकांना होणार आहे.

जीवन कौशल्ये, बालकांच्या संगोपनात पालकांची भूमिका या विषयांवर मानसशास्त्रीय तज्ञ नयना डीन्नी या पालकांशी थेट संवाद साधणार आहेत. नयना डीनी या सुप्रसिद्ध जीवन प्रशिक्षक (Life Coach) आणि मानासशात्रीय तज्ञ असून त्यांनी आत्तापर्यंत आपल्या भावना व आपली कर्तव्य यामध्ये सुसंवाद साधण्यासाठी ७०० हून अधिक लोकांना प्रशिक्षण व समुपदेशन केलेले आहे. या प्रमाणित समुपदेशक असून यांचा पालकत्व (Parenting) यावर विशेष अभ्यास आहे.

शैक्षणिक समुपदेशक म्हणून प्रा. डॉ. आश्लेषा भांडारकर या देखील या संवादात तज्ञ म्हणून सहभागी होणार आहेत. प्रा. डॉ. आश्लेषा भांडारकर यांनी भावनिक बुद्धिमत्ता आणि सामाजिक समायोजन क्षमता या शैक्षणिक मानसशास्त्राच्या विषयात पीएच. डी. संपादन केलेली आहे. गेली एकवीस वर्ष त्यांच्या जवळ शिक्षक प्रशिक्षक व विभाग प्रमुख म्हणून अनुभव आहे. त्या नगर शहरात शासन नियुक्त 'स्वच्छता दूत' म्हणूनही शहरात सुपरिचित आहेत. बालकांची शैक्षणिक वाटचाल व पालकांच्या अपेक्षा यावर प्रा. डॉ. भांडारकर प्रकाश टाकणार आहेत. त्यांच्या अनुभवाचा फायदाही पालकांना होणार आहे. हे सर्व तज्ञ पालकांच्या प्रश्नांना प्रत्यक्ष उत्तर देणार आहेत.

याच कार्यक्रमात भाग्यवान तीन पालकांना पालात्क्वासंबंधी प्रत्यक्ष मोफत समुपदेशनासाठी निवड केली जाणार आहे. तसेच दहा विद्यार्थांना गणित फौंडेशन कोर्स १ महिन्यासाठी अगदी मोफत दिला जाणार आहे.

या कार्यक्रमाच्या मोफत प्रवेशिका पास अकॅडेमी, पत्रकार चौक, अहिल्यानगर येथे कार्यालयीन वेळेत उपलब्ध आहेत. पालकांनी याचा फायदा घ्यावा. माहितीसाठी ७२७६६८९०११ व ७३८७१२५०११ या क्रमाकांवर संपर्क साधावा.



श्रावणी जितेंद्र शिरसाठ एमपीएससी परीक्षा उत्तीर्ण झाल्याबद्दल तिचा सत्कार करताना कुस्ती कोच वसंत मेघडंबर व न्यू आर्टस् महाविद्यालयाचे कार्यालयीन अधीक्षक जगन्नाथ साबळे.

## पाईपलाईन रोड परिसरातून अल्पवयीन मुलीचे अपहरण

नगर – सावेडी उपनगरातील पाईपलाईन रोडवरील श्रमिकनगर येथून १४ वर्षीय अल्पवयीन मुलीस कोणीतरी अज्ञात इसमाने कशाचे तरी अमिष दाखवून तिचे अपहरण केल्याची घटना ९ जून रोजी दुपारी दोन वाजण्याच्या सुमारास घडली.

मुलगी घरी दिसून न आल्याने तिच्या घरच्यांनी तिचा घराच्या आसपास, तिच्या शाळेजवळ तसेच मैत्रिणींच्या घरी, व संपूर्ण श्रमिकनगर परिसरात शोध घेतला. परंतु ती कोठे ही मिळून आली नाही. नातेवाईकांकडे केलेल्या चौकशीतही तिच्याबाबत काहीही माहिती मिळाली नाही त्यामुळे तिचे कोणीतरी अपहरण केले असल्याचा संशय व्यक्त करत तिच्या आईने दिलेल्या माहितीवरुन तोफखाना पोलीस ठाण्यात अज्ञात इसमाविरुद्ध अपहरणाचा नोंद दाखल करण्यात आला आहे.

# दुर्ग वेडे ट्रेकर्स व अरण्या फाऊंडेशनकडून गोरक्षनाथ गडावर राबविली स्वच्छता मोहीम

निंबळक – अहिल्यानगर जवळील गोरक्षनाथ गडावर देवस्थान ट्रस्ट व ग्रामस्थांकडून स्वच्छतेच्या बाबतीत व कचरा व्यवस्थापनात अक्षम्य दुर्लक्ष व हलगर्जीपणा झाला असून गोरक्षनाथ गडावर कचराच कचरा साचला आहे, म्हणून दुर्ग वेडे ट्रेकर्स व अरण्या फाऊंडेशन अहिल्यानगर च्या सदस्यांकडून गोरक्षनाथ गड येथे ७ व १० जून रोजी सकाळीच स्वच्छता मोहीम राबविण्यात आली. गोरक्षनाथ गडावर अनेक भावीक – भक्तगण तसेच निसर्ग पर्यटनासाठी मोठ्या संख्येत लोक येतात. त्यांच्याकडून मोठ्या प्रमाणात इतस्तत कचरा फेकण्याचे प्रमाण सुद्धा जास्त आहे. गडाचे पावित्र्य व सौंदर्य अबाधित राहावे यासाठी काही पर्यावरण प्रेमींकडून कचरा संकलन करण्यात आला. या कामी दूर्ग वेडे ट्रेकर्स अहिल्यानगरचे सदस्य अंकुश लोंढे, अक्षय चौधरी, रामदास शिंदे, किरण चेडे, पांडूरंग व्यवहारे, अक्षय वाघ, रामेश्वर गवळी आणि अरण्या फाऊंडेशनचे सदस्य अमित गायकवाड, संदेश कपाळे, अजिंक्य सुपेकर यांनी प्रामुख्याने सहभाग घेतला. आशुतोष महाराज यांनी नेवासा येथील काही नाथभक्त सुद्धा या मोहीमेत सहभागी झाले होते. कचरा संकलन केल्या बद्दल या सर्व सदस्यांचा सत्कार देवस्थान ट्रस्ट, आशुतोष महाराज व सरपंच जालिंदर कदम यांचेकडून करण्यात आला.



दुर्ग वेडे ट्रेकर्स व अरण्या फाऊंडेशन कडून गोरक्षनाथ गडावर स्वच्छता राबविली गेली.

हा कचरा एकूण २० भोत (मोठ्या गोण्या) भरल्या आहेत. त्यापैकी ४ भोत मध्ये केवळ प्लास्टिक बाटल्या स्वतंत्र वेगळ्या जमा केल्या आहेत. उर्वरित गोण्यांमध्ये प्लास्टिक पत्रावळ्या, डेकोरेशन साहित्य, चिप्स ची पाकिटे, इत्यादि मिश्र स्वरुपात कचरा आहे. अजूनही २० गोण्या त्या ठिकाणी भरतील इतका कचरा आहे. स्थानिक गावात कचर्याचे रीसाइक्लिंग यूनिट नाही. त्यामुळे आपण हा कचरा स्थानिक ग्रामपंचायतीच्या ताब्यात न देता नगरला घेऊन येणार आहोत. प्लास्टिक बाटल्या खाजगी संकलकांना विकणार आहोत.

इतर कचरा पुन्हा एकदा सॉर्ट करून उर्वरीत महानगरपालिकेच्या कचरा व्यवस्थापन विभागात देणार आहोत, अशी माहीती दुर्ग वेडे ट्रेकर्सचे अंकुश लोंढे यांनी दिली.

# मरावे परी नेत्ररुपी उरावे ।।

'मरावे परी किर्ती रुपे उरावे' किती सार्थ आहे ही म्हण! आपल्या भारतीय संस्कृतीत दान देण्यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या जवळील एखादी वस्तु ज्यांच्याकडे त्याची कमतरता आहे अशा व्यक्तीस दान देण्यात जे आत्मिक समाधान लाभते त्याची कल्पना करता येणार नाही. जुन्या काळी राजे, श्रीमंत, वगैरे धन, कपडे, अन्नदान करीत असत व गरीब लोकांचा दुवा घेत. आजच्या युगात लोकांचा जीव वाचविण्यासाठी 'रक्तदान', अंध लोकांना दृष्टी प्राप्त होण्याठी 'नेत्रदान' व वैद्यकीय ज्ञानासाठी व संशोधनासाठी मरणोत्तर 'देहदान' एखाद्या गरजु व्यक्तीस 'किडनी दान' इ.नवीन संकल्पना रुढ होत आहेत व यास अनन्यसाधारण महत्त्व आहे. आपल्या हिंदू संस्कृतीत दान करुन पुण्य मिळते अशी एक भावना आहे. कुणातरी गरजू रुग्णास वरील दान करण्यास काही श्रीमंत किंवा राजा व्हायची गरज नाही.कोणीही सामान्य व्यक्ती धर्म, लिंग, वर्ण भेद न ठेवता हे सत्कार्य करु शकतो व मानवतेची मूल्ये रोखु शकतो.

जगातील ८ कोटी अंध व्यक्तींपैकी भारतात जवळपास १/४ अंध व्यक्ती भारतात आहेत. कुपोषण, 'अ' जीवनसत्त्वाचा अभाव, डोळ्यात कचरा अथवा रसायने गेल्यामुळे, गोवर, कांजण्या किंवा इतर अन्य कारणांमुळे टीक पडून लहान वयात अथवा तारुण्यात दृष्टी गमावलेल्या रुग्णांची संख्या २५ लाखापर्यंत आहे. यास Corneaopacity अथवा टीक अथवा फुल पडणे असे म्हणतात. अशा व्यक्तीच्या आयुष्यासमोर किर्रर काळोख पसरलेला असतो. सभोवतालच्या जगाचा रंगीबेरंगी आस्वाद घेण्याचे भाग्य, पदोपदी ठेचकाळत या निराशेच्या अंधारात चालणाऱ्या निष्पाप जिवांकडे नसते. यातील बऱ्याच नेत्ररुग्णांना बुबुळावरील आवरण जे पांढरे झाले आहे. (Cornea) त्याची शस्त्रक्रिया करुन जर त्या जागी निरोगी पारदर्शक बुबळ बसवण्यात आले तर गेलेली दृष्टी बऱ्याच अंशी परत लाभू शकते.

सन १९२४ साली अमेरिकेत अशी कल्पना सुचली व ती यशस्वी झाली. आणि अंध:कारात एका प्रकाशाचा झोत आला. या शस्त्रक्रियेस 'नेत्ररोपण' (Keratoplasty) असे म्हणतात. मृत व्यक्तीने स्वेच्छेने केलेले नेत्रदान जिवंत व्यक्तींना डोळस बनवू लागले. परंतु दुर्दैवाने आजही ही चळवळ अंधांचे अश्रू पुसण्यासाठी फारच अपुरी आहे. जितक्या प्रमाणात नेत्रदान व्हावयास हवे तितकी जागृती आजही आपल्या समाजात आली नाही. आज श्रीलंकेसारख्या देशात डोळे काढण्याचा अधिकार सरकारचा आहे.

### नेत्रदान म्हणजे काय?

कुणाही व्यक्तीने स्वेच्छेने मृत्यूनंतर आपले डोळे काढून कुणाही परिचित किंवा अपरिचित व्यक्तीला दृष्टी मिळावी म्हणून अथवा संशोधनासाठी वापरावयास दिलेली परवानगी.

### नेत्रदान कोण करु शकतो?

कुणीही जातीधर्म, वंशभेद, वर्णभेद, गरीब, श्रीमंत, स्त्री–पुरुष, लहान–मोठा मरणोत्तर नेत्रदान करु शकतो. वय साधारण १ वर्षापुढे ते सुमारे ७०–८० वर्षापर्यंत.

### कोणाचे नेत्रदान स्विकारता येत नाही?

मृत व्यक्ती जर जॉन्डीस (Infective Hepatitis) व्हायरल मोनंनजायटीस, कॅन्सर, डोळ्यास पूर्वी काही शस्त्रक्रिया झाली असल्यास, एडस्, बुडून मृत्यू आल्यामुळे, फाशी घेतल्यामुळे इ. काही कारणे असू शकतात म्हणून रुग्णांचे मृत्यू निदान (Death Certificate) डोळे काढण्यापूर्वी होणे आवश्यक आहे.

### नेत्रदान कसे करावे?

आपण मरणोत्तर नेत्रदान करु इच्छिता याची आपल्या नातेवाईकांस माहिती द्यावी व आवश्यक ते फॉर्मस् जवळच्या नेत्रपेढीत भरुन द्यावे. असे इच्छापत्र भरलेल्या रुग्णांचा मृत्यू झाल्यास त्याच्या जवळच्या नातेवाईकांनी लगेच मृत्युकारणमिमांसा करुन घ्यावी व जवळच्या नेत्रपेढीस कळवावे.

मृत व्यक्तीचे डोळे बंद करुन त्यावर बर्फाच्या पाण्याच्या पट्ट्या ठेवाव्यात व अधूनमधून अँटीबायोटिक थेंबाची औषधे डोळ्यात टाकावीत. खोलीतील पंखे बंद करावेत, यामुळे डोळे वाळणार नाहीत.

### नेत्रपेढी म्हणजे काय?

नेत्रपेढी (Eye Bank) ही एक समाजसेवी संस्था असून ती मरणोत्तर नेत्रदानाची जपणूक करुन गरजू रुग्णांना डोळे उपलब्ध करुन देते. नेत्रदाता व गरजू रुग्ण ह्यांची सूची तयार करणे, संपर्क साधणे, नेत्रदान घडवून आणणे व मिळालेल्या डोळ्याचा सांभाळ करणे व ते गरजुंना उपलब्ध करुन देणे, नेत्रदानाबाबत चळवळ चालवणे, विविध संशोधन करणे. इ. प्रमुख कार्ये या संस्थेतर्फे केली जातात.

### मृत्यूनंतर किती वेळात डोळे काढावेत?

साधारण ४–६ तास.

### अशा डोळ्यांचे 'नेत्ररोपण' हे किती वेळेच्या आत करावे?

साधारणपणे २४–४८ तास. परंतु काही कल्चर मिडीया, लिक्वीड नायट्रोजन व अन्य रासायनिक प्रक्रियेमुळे महिना दोन महिने देखील असे डोळे वापरता येतात. काढलेला डोळा हा संपूर्ण कधीच बसविला जात नाही, त्यातील बुबुळाचा भागच (Cornea) फक्त बदलला जातो.

### अशा किती शस्त्रक्रिया यशस्वी होतात?

सर्व गोष्टी योग्य प्रकारे घडल्यावर सर्वसाधारण ७० टक्के शस्त्रक्रिया यशस्वी होतात. जर दाता व गरजू दोन्हीही तरुण असल्यास व डोळे काढणे व शस्त्रक्रिया यात जास्त वेळ गेला नाही तर यशस्वितेचे प्रमाण सर्वाधिक असते. जर दाता व गरजू यांच्या पेशी एकमेकास अनुरुप न झाल्यास (Tissue Rejection) अशा शस्त्रक्रिया अयशस्वी होऊ शकतात.

### एक व्यक्तीच्या नेत्रदानाने दोन अंध व्यक्तीस दृष्टी लाभ होतो

बुबुळावर टीक पडून अंधत्व येणे दुर्दैवाने लहान मुलांत, तरूणांमध्ये, काम करणाऱ्या वर्गात आढळून येते. भारतात सुमारे २५ लाख लोकांमध्ये ह्या अंधत्वाचे कारण असून जगात सर्वात जास्त अंध व्यक्ती भारतात राहतात. ज्या वयात काम करून राष्ट्र उभारणीत आपले योगदान द्यावे त्या वयात ह्या तरूणांनी समाजावर व राष्ट्रावर भार टाकावा, परावलंबी जीवन जगावे ही गोष्ट देशासाठी भूषणावह नाही. ह्या लोकांना नेत्रदानाशिवाय पर्याय नाही. २५ लाख गरजू आणि नेत्रदान फक्त ३५ ते ४० हजार हे फारच व्यस्त प्रमाण आहे. अंधश्रद्धा व अज्ञान ह्यामुळे नेत्रदानाचे प्रमाण भारतात कमी आहे. श्रीलंका ह्या आपल्या शेजारील छोट्याशा देशाकडे आपण पहायला हवे. श्रीलंकेत मोठ्या प्रमाणात नेत्रदान होते. आपली गरज भागवून जगातील अनेक देशांना डोळे निर्यात करण्यात येते. भारतात जैन समाजात नेत्रदानाचे प्रमाण सर्वात जास्त आहे त्याचे इतरांनी अनुकरण करणे गरजेचे आहे. ह्यामध्ये धर्मगुरूंनी पुढाकार घ्यावा.

भारतामध्ये नेत्रपेढीच्या संख्येत वाढ व्हायला हवी. ह्या सुविधा अतिशय अपुऱ्या आहेत. आता नेत्रदान केलेल्या बुबुळाचे वेगवेगळे विभाग दोन किंवा अंध व्यक्तींना वापरता येतात. ह्यावर जगात मोठ्या प्रमाणात संशोधन चालू आहे. भारतात ह्याचे प्रमाण कमी आहे. नेत्रपेढ्या उभारण्यावर मोठा खर्च येतो त्यासाठी सेवाभावी संस्थांनी पुढे यावे. सरकारनेही आर्थिक मदत करावी. ह्या प्रकारचे अंधत्व गरीब लोकांमध्ये अधिक आहे. शस्त्रक्रियेचा खर्च त्यांना झेपणार नाही. सरकारने ह्यासाठी ही आर्थिक मदत करावी तरच व्यापक प्रमाणात ही मोहीम राबविता येईल.

नगर शहरात सुमारे तीस वर्षापूर्वी मानकन्हैय्या नेत्रपेढीची स्थापना साईसूर्य नेत्रसेवा ह्या संस्थेत झाली. नगरकरांनी नेत्रदानाची चळवळ अतिशय प्रभावीपणे राबविली. ह्यासाठी अनेक सामाजिक संघटना, वैद्यक व्यावसायीक, सामादिक कार्यकर्ते, वर्तमानपत्रे, तरूण मंडळे पुढे आले आणि आज महाराष्ट्रात सर्वात जास्त नेत्रदान अहमदनगर शहरासारख्या छोट्या गावात होते हे निश्चितच दिलासा देणारे आहे. मागील ३० वर्षात सुमारे अडीच हजार नेत्ररोपणाच्या शस्त्रक्रिया करण्यात आल्या. डॉ. वर्धमान कांकरिया यांनी नेत्ररोपणाच्या आधुनिक शस्त्रक्रियेबद्दल चेन्नई व ग्रीस (युरोप) मध्ये अभ्यास केला आहे. त्याचाही उपयोग आपल्या येथील रूग्णांना होतो आहे. महाराष्ट्र शासनानेही मानकन्हैय्या नेत्रपेढीचा गौरव सातत्याने केला आहे आणि हे यश नगर शहरातील जनतेचे आहे. परंतु अजूनही फार मोठा प्रवास करायचा आहे. अंधत्च दूर करण्यासाठी मोठ्या प्रमाणात जनजागृती होणे आवश्यक आहे. नेत्रदानाचे प्रमाण वाढणे आवश्यक आहे.

**– डॉ. सुधा कांकरिया,**
मानकन्हैय्या आय बँक, साई सूर्य नेत्रसेवा, अहमदनगर

# नेत्रदान चळवळीची प्रकाशझोत नागरदेवळ्यावरून

## जालिंदर बोरुडे यांच्या नेतृत्वाखाली फिनिक्स फाऊंडेशनचा सामाजिक वसा; ११६० अंधांना मिळाली नवदृष्टी



नगर – नगर तालुक्यातील छोट्याशा नागरदेवळे गावातून सुरू झालेली नेत्रदान चळवळ आज राज्यभर परिचित झाली असून, या चळवळीचा केंद्रबिंदू ठरले आहेत जालिंदर बोरुडे. जलसंपदा विभागात कार्यरत राहून व सेवानिवृत्त झाल्यानंतरही समाजसेवेचा ध्यास घेतलेले हे अवलिया गेली ३३ वर्षे नेत्रदान व मोतीबिंदू शस्त्रक्रियांच्या माध्यमातून लाखो गरजूंना प्रकाश दाखवत आहेत. त्यांच्या फिनिक्स सोशल फाऊंडेशन माध्यमातून आतापर्यंत ११६० अंधांना मरणोत्तर नेत्रदानातून नवदृष्टी मिळाली आहे. या चळवळीने अनेकांचे जीवन उजळले असून, समाजात नेत्रदानाबाबत जागृती निर्माण झाली आहे.

१९९१ साली स्वत:च्या आईला आलेल्या अंधत्वामुळे जालिंदर बोरुडे यांनी गरजूंना नेत्रदोषाचे मोफत उपचार मिळण्यासाठी फिनिक्स सोशल फाऊंडेशनची स्थापना केली. या फाऊंडेशनच्या माध्यमातून मोफत शिबिर घेऊन नेत्रदानाची जनजागृती सुरु झाली. विडी कामगार, शेतकरी, मजूर, हमाल, महिला व गरिबांसाठी काहीतरी करणे, या सामाजिक बांधिलकीतून फिनिक्सने पुढाकार घेऊन ही चळवळ पुढे चालवली.

या उपक्रमांतर्गत जिल्ह्यातील विविध भागात दरमहा पाच नेत्रतपासणी व मोतीबिंदू शस्त्रक्रिया शिबिरांचे आयोजन केले जाते. या शिबिराचा लाभ जिल्ह्यासह राज्यातील गरजू घटक याचा लाभ घेत आहे. आतापर्यंत ३ लाख ७६ हजारांहून अधिक रुग्णांवर मोफत मोतीबिंदू शस्त्रक्रिया करण्यात आल्या आहेत.

नेत्रदानाच्या महत्वाची जाणीव करून देण्यासाठी बोरुडे यांनी दृष्टीमित्र, नेत्रज्योत व अंधारातून प्रकाशाकडे ही तीन प्रेरणादायी पुस्तके लिहिली आहेत. त्यांचे प्रकाशन अण्णा हजारे व भास्करगिरी महाराज यांच्या हस्ते झाले. या पुस्तकांमधून नेत्रदानासाठी समाजात सकारात्मक वातावरण निर्माण झाले असून, हजारो नागरिकांनी नेत्रदानाचा संकल्प केला आहे. त्यांच्या कार्याला कुटुंबीयांचेही भरभरून पाठबळ लाभते आहे. घरच खाऊन दुसऱ्यांचे काम का करायचे? अशा टीकांनाही ते हसत उत्तर देतात, समाधान मिळतं ना, मग बस!

सामान्य व गरजू नागरिकांसाठी मोफत नेत्र उपचार व आधुनिक सेवा देणारे फिनिक्स नेत्रालय उभारण्यासाठी बोरुडे यांचे प्रयत्न सुरू आहेत. तपोवन रोडवर स्वतःच्या मालकीच्या जागेत हे रुग्णालय उभारले जाणार असून, त्याचा आराखडा तयार झाला आहे. लोकवर्गणीतून हा प्रकल्प उभारण्यात येणार असून लवकरच प्रत्यक्ष कामास सुरुवात होणार आहे.

### फिनिक्सची जबाबदारी, दृष्टीहीनांना नवदृष्टी देण्याची

जालिंदर बोरुडे यांनी उभी केलेली ही चळवळ केवळ एक वैद्यकीय उपक्रम नसून, ती एक सामाजिक क्रांती आहे. प्रत्येकाने नेत्रदानासाठी पुढाकार घेतल्यास, अंधत्वमुक्त समाजाच्या दिशेने एक पाऊल पुढे टाकले जाईल. नेत्रदान हेच सर्वश्रेष्ठ दान या घोषवाक्याला कृतीची जोड देत फिनिक्स फाऊंडेशन समाजाला नवी दिशा देत आहे. वर्षभरात फिनिक्स नेत्रालय उभारण्याचा संकल्प असून, फिनिक्स नेत्रालयासाठी सर्वांनी हातभार लावण्याची गरज आहे. या नेत्रालयाच्या माध्यमातून गरजूंवर मोफत उपचार व शस्त्रक्रिया केल्या जाणार आहेत, असे फिनिक्स सोशल फाऊंडेशनचे संस्थापक अध्यक्ष जालिंदर बोरुडे यांनी सांगितले.



### दत्ता गायकवाड यांचा सर्मथकांसह शिवसेना ठाकरे गटात प्रवेश

सावेडी उपनगर, बोल्हेगाव, नागापूर विभागामध्ये काम करणारे दत्ता गायकवाड यांनी सहकाऱ्यां समवेत विधान परिषदेचे राज्याचे विरोधी पक्षनेते ना. अंबादास दानवे यांच्या उपस्थितीत शिवसेनेत प्रवेश केला आहे. यावेळी शहर प्रमुख किरण काळे, जिल्हाप्रमुख राजेंद्र दळवी, युवा सेनेचे जिल्हाप्रमुख पप्पू भाले, दीपक भोसले, विलास उबाळे, सुनील त्रिपाठी, रावजी नांगरे, विकेश गुंदेचा, संजय वल्लाकट्टी, राजू औटी, सुनील भोसले, अहिल्यानगर शहर विधानसभा युवा अधिकारी आनंद राठोड, गौरव ढोणे, महावीर मुथा, किशोर वाघ, सचिन शेंडगे, सुजय लांडे, ऋतुराज आमले, मिलन सिंग, शंकर आव्हाड, किशोर कोतकर, गणेश आपरे, विकास भिंगारदिवे, मयूर भिंगारदिवे, जयराम आखाडे, भगवान शेंडे, दीपक काकडे, सिद्धांत भिंगारदिवे, पोपट लोंढे, भगवान शेंडे, रोहिदास भालेराव, विनोद शिरसाट, सचिन भालेराव, सचिन कापुरे उपस्थित होते.





स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांच्या वतीने आवाहन, नेत्रदान जागृती पोस्टरचे अनावरण करताना जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे.

# अक्षर साहित्य प्रतिष्ठानच्यावतीने उत्कृष्ट साहित्यकृतींचा होणार गौरव

नगर – राज्यातील साहित्यिकांच्या उत्कृष्ट साहित्यकृतींचा गौरव केला जाणार आहे. अहिल्यानगर येथील अक्षर साहित्य प्रतिष्ठानच्या वतीने सद्गुरू साहेबराव आवारे यांच्या नावाने हे पुरस्कार दिले जाणार आहेत. या वर्षीपासून हा उपक्रम राबविण्यात येणार आहे.

याबद्दल कवियित्री स्वाती पाटील यांनी माहिती दिली. प्रसिद्धीपत्रकात त्यांनी म्हटले आहे की, अक्षरच्या वतीने विविध साहित्यिक उपक्रम सुरू असतात. नवोदित साहित्यिकांना नेहमीच या माध्यमातून व्यासपीठ मिळाले आहे. हे साहित्य पुरस्कारही त्याचाच एक भाग आहे. सद्गुरू साहेबराव आवारे यांचे आध्यात्मात मोठे काम आहे. राज्यभरात त्यांच्या नावाने गोशाळा, अन्नछत्र, स्पर्धा परीक्ष्का मार्गदर्शन केंद्र चालविले जाते. योग व ध्यान वर्गांचेही आयोजन केले जाते. परंतु ते मूळ साहित्यिक आहेत. त्यांनी योगसूत्र, भगवद्गीता, ज्ञानेश्वरीचे त्यांनी संपादन केले आहे. त्यांना १९८० च्या दशकात खेळ मांडियेला या ललितसाठी राज्य सरकारचा उत्कृष्ट वाङ्मय पुरस्कारही मिळाला आहे. यासाठी त्यांच्या नावे उत्कृष्ट साहित्यकृतींचा गौरव केला जाणार आहे.

कादंबरी, कविता तसेच कथासंग्रह, नाटक, लेखसंग्रह, चरित्र, आत्मचरित्र, ग्रंथ, वैचारिक आदी प्रकारातील साहित्यकृतींचा गौरव केला जाणार आहे. वरील प्रकारातील ३ उत्कृष्ट साहित्यकृतींना प्रत्येकी ५ हजार रूपये रोख, सन्मानचिन्हे, गुरूजींची ग्रंथसंपदा भेट दिली जाणार आहे, अशी माहिती प्रा. हेमलता पाटील यांनी दिली. पुरस्कार प्रदान सोहळा लवकरच आयोजित केला जाणार आहे.

या पुरस्कारासाठी संबंधितांनी प्रा. हेमलता पाटील, राजवर्धन पॅलेस, विंग ए, प्लॅट क्रमांक २, गाडळकर मळा, सारस पुलाजवळ, सारसनगर, अहिल्यानगर–४१४००१ या पत्त्यावर आपले साहित्य (सन २०२३ व २०२४ मधील प्रकाशित) दोन प्रतीत पाठवावे, असे आवाहन करण्यात आले आहे.

अधिक माहितीसाठी ९२२५६१३६५२ व ७२१८१२७४३९

# प्रत्येकाने मरणोपरांत नेत्रदानाचा संकल्प करावा

## स्नेहबंधच्या वतीने आवाहन, नेत्रदान जागृती पोस्टरचे अनावरण

नगर – नेत्रदान हे सर्वश्रेष्ठ दान आहे. केवळ नेत्रदानाचे संकल्प पत्र भरून देऊन थांबू नये तर आपल्या मृत्यूनंतर आपले नेत्र दुसऱ्याला दृष्टी देण्याकरिता उपयोगी आणावे, प्रत्येक नागरिकाने मरणोपरांत नेत्रदानाचा संकल्प करावा, असे आवाहन स्नेहबंध सोशल फौंडेशनचे संस्थापक अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे यांनी केले आहे.

स्नेहबंधच्या वतीने जागतिक नेत्र दिनानिमित्त जागृती पोस्टरचे अनावरण जिल्हाधिकारी डॉ. पंकज आशिया, जिल्हा पोलीस अधीक्षक सोमनाथ घार्गे, आमदार संग्राम जगताप, जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी आनंद भंडारी, मनपा आयुक्त यशवंत डांगे, जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी सुधाकर बोराळे, उपवनसंरक्षक धर्मवीर सालविठ्ठल, छावणी परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी विक्रांत मोरे यांच्या हस्ते झाले. यावेळी स्नेहबंधचे अध्यक्ष डॉ. उद्धव शिंदे, कृषी उपअधीक्षक सागर गायकवाड, अमित खामकर उपस्थित होते.

डॉ. उद्धव शिंदे म्हणाले, सर्वश्रेष्ठ समजले जाणारे नेत्रदान करण्याचे भाग्य प्रत्येकाने पदरी पाडून घ्यावे. कारण आपण केलेल्या नेत्रदानामुळे नेत्रहीन व्यक्तीदेखील या सुंदर सृष्टीचे विलोभनीय दृश्य बघू शकते. मृत्यूपश्चात आपण कुणाच्या तरी आयुष्यातील अंधकार दूर करू शकतो, हा एकमेव विचार डोळ्यापुढे ठेवून प्रत्येकाने नेत्रदान करावे.



### सरोद वादक अमजद अली खान यांना ध्यानधारणेची पुस्तके भेट

जगभरात १४३ देशात ध्यानधारणा शिकवणाऱ्या प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या वतीने सरोद वादक अमजद अली खान यांची भेट घेऊन त्यांना ध्यानधारणेबद्दल मार्गदर्शन करून ध्यानधारणा प्रशिक्षक बी के डॉ. दीपक हरके व प्रजापिता ब्रह्माकुमारी ईश्वरीय विश्वविद्यालयाच्या बाणेर सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी डॉ. त्रिवेणी दीदी यांनी ध्यानधारणेची पुस्तके भेट दिली. यावेळी सूस सेवाकेंद्राच्या संचालिका ब्रह्माकुमारी आशा दीदी उपस्थित होत्या.

# मोबाईल दुकानासमोर लावलेल्या हिरो होंडा मोटारसायकलची चोरी

नगर – विखे पाटील हॉस्पिटलच्या मेन गेटच्या शेजारी असलेल्या मोबाईल शॉपी दुकानासमोर रस्त्याच्या कडेला लॉक करुन लावलेली ३० हजार रुपये किमतीची, हिरो होंडा कंपनीची स्प्लेंडर मोटारसायकल (क्र एम एच १५ बी वाय २५४८) कोणीतरी अज्ञात चोरट्याने चोरुन नेली.

याप्रकरणी एमआयडीसी पोलीस ठाण्यात विलास गोरक्षनाथ कोल्हे (वय ३४, रा. नवनागपूर, अ.नगर) यांनी दिलेल्या फिर्यादीवरुन अज्ञात चोरट्याविरुद्ध पोलिसांनी भारतीय न्याय संहिता कलम ३०३ (२) प्रमाणे चोरीचा गुन्हा दाखल केला आहे.


## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी खुप मोठी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही. असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून **७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १०/०६/२०२५

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर पोटतुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी जिल्हा परिषद हद्दीतील **मौजे सावेडी येथील आनंदनगर सहकारी गृहनिर्माण संस्था मर्यादीत अहमदनगर** मधील खालील वर्णनाची प्लॉटसह बांधकाम असलेली मिळकत –

**सर्व्हे नं. ९५ मधील प्लॉट नं. ११ चे एकुण क्षेत्रफळ ६२१.०० चौ. मी. यापैकी लिहुन देणार यांच्या मालकीचा पश्चिम बाजुचा प्लॉट ३१०.५ चौ. मी. हा संपुर्ण प्लॉट व त्यावरील पत्र्याचे शेड व पत्र्याचे दुकान गाळेसह सर्व तदंगभुत वस्तुसह काही एक राखुन न ठेविता संपुर्ण मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – प्लॉट नं.११ पैकी सुहास पांडुरंग जरे यांच्या मालकीचा प्लॉट
दक्षिणेस – प्लॉट नं. १०
पश्चिमेस – लागु सर्व्हे नंबर
उत्तरेस – गुलमोहर रोड

**वर नमुद मिळकतीचे विद्यमान मालक –**
**संतोष पांडुरंग जरे**
रा. आनंद नगर, गुलमोहर रोड, सावेडी, अहिल्यानगर.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेल्या मिळकतीचा विक्री व्यवहार आमचे अशिलांबरोबर होणार आहे, सदर मिळकत निर्वेध निजोखमी व बोजाविरहित आहे असे विद्यमान मालकाचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अगर इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द **झालेपासून ७ दिवसांचे** आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हांस कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहे त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहे असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पुरा करतील. मग कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

हि नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १०/०६/२०२५

**मिळकत वर्णन :** जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी नगरपैकी, **महानगरपालिका हद्दीतील मौजे माळीवाडा** येथील **सर्व्हे नंबर** १०७/२ मधील खालील वर्णनाच्या मिळकती –

| प्लॉट नंबर | क्षेत्रफळ चौ.मी. | चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| ५ | ९६.७२ हा संपुर्ण प्लॉट | लागु सर्व्हे नंबर १०६ | प्लॉट नंबर ६ | रस्ता | प्लॉट नंबर ४ |
| ६ | ९७.९५ हा संपुर्ण प्लॉट | लागु सर्व्हे नंबर १०६ | प्लॉट नंबर ७ | रस्ता | प्लॉट नंबर ५ |
| ७ | ९८.२४ हा संपुर्ण प्लॉट | लागु सर्व्हे नंबर १०६ | प्लॉट नंबर ८ | रस्ता | प्लॉट नंबर ६ |
| ८ | ९८.२७ हा संपुर्ण प्लॉट | लागु सर्व्हे नंबर १०६ | प्लॉट नंबर ९ | रस्ता | प्लॉट नंबर ७ |

**विद्यमान मालकांचे नाव-**
**रुपल संजय मेहता**
रा. किल्ल्याजवळ, अहिल्यानगर

**ॲड.आर.टी.शर्मा**
**ॲड. गणेश एम. शर्मा**
मो.नं. ९४२२२२०८४५
ऑफीस नं. १४,१७, पहिला मजला
श्री आनंद कॉम्प्लेक्स, दाळमंडई, अहिल्यानगर



## जाहीर नोटीस

तमाम लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यांत येते कि, खालील परिशिष्टामध्ये वर्णन केलेली मिळकत विक्रीचा व्यवहार सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी आमचे अशिला बरोबर केलेला आहे व त्यापोटी विद्यमान मालकांनी आमच्या अशिलाकडुन विसारापोटी रक्कम स्विकारलेली आहे. सदर मिळकत निर्वेध, निजोखमी आहे व सदर मिळकतीबाबत कुठलाही वाद चालु नाही अथवा प्रलंबित नाही व सदर मिळकतीवर कुठल्याही बँकेचे, पतसंस्थेचे अथवा वित्तीय संस्थेचे कर्ज नाही व सदर मिळकतीबाबत विद्यमान मालकाचे टायटल स्वच्छ, कायदेशीर व बाजारी आहे असे मिळकतीचे विद्यमान मालकांचे म्हणणे आहे. परंतु कोणाचीही तक्रार राहू नये म्हणून या जाहीर नोटीसद्वारे कळविणेत येते कि, सदर मिळकतीबाबत कोणताही चालू वाद असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत गहाण, दान, बक्षीसपत्र, अव्वल जप्ती, बँक बोजा, भाडेकरार, साठेकरार, मदार, मनाई हुकूम, स्थगिती, पोटगी, चार्ज, लीन, इजमेंट अन्वये कोणाचेही हक्क व अधिकार असल्यास अथवा सदर मिळकतीबाबत इतर कोणताही चालू वाद असल्यास संबंधितांनी ही जाहीर नोटीस प्रसिध्द झालेपासून १५ दिवसांचे आत खालील पत्त्यावर समक्ष लेखी अथवा रजिस्टर्ड पोस्टाने योग्य त्या कागदपत्रांचे नकलासह आम्हास कळवावे व आमची खात्री करुन द्यावी. मुदतीत कोणाचीही कोणतीही हरकत न आल्यास अथवा ज्याचे काही हक्क, हितसंबंध आहेत त्यांनी जाणीवपूर्वक सोडून दिले आहेत असे समजून आमचे अशिल खरेदीचा व्यवहार पूर्ण करतील. मग त्यानंतर कोणाचीही तक्रार चालणार नाही याची नोंद घ्यावी.

ही नोटीस प्रसिध्दीस दिली. ता. १०/०६/२०२५

**परिशिष्ट मिळकतीचे वर्णन**

जिल्हा अहिल्यानगर, पोटतुकडी व तालुका अहिल्यानगरपैकी, अहिल्यानगर महानगरपालिका हद्दीतील, **मौजे सावेडी** येथील मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे –

**सर्व्हे नं. २४५ /ब/ २ चे एकुण क्षेत्र ०हे. ६ ३आर (६३००.०० चौ. मी.) ही संपुर्ण मिळकत.**

**यांसी चतु:सिमा :**

पुर्वेस – वडगांव रस्ता | दक्षिणेस – सर्व्हे नंबर २४५ पैकी जमिन
पश्चिमेस – नगर – मनमाड रोड | उत्तरेस – नाला / ओढा

**वर नमुद प्लॉट मिळकतीचे विद्यमान मालक –**
**पारसमल मश्रीमल शाह**
रा. गांधीनगर, गुजरात.

**ॲड. समीर वखारे**
पत्ता :– ऑफीस नं. ५, पहिला मजला,
साई कॉर्नर बिल्डींग, चितळे रोड, अहमदनगर.
मो. नं. ९०११६७८९९९. ९८६०८०५५५९



## जाहीर नोटीस

या जाहीर नोटीसीने तमाम लोकांस कळविणेत येते की, खालील परिशिष्ठात नमुद केलेली मिळकत विद्यमान मालक **सौ. सुप्रिया डि. डोकले (सौ.सुप्रिया दगडु ढोकले) रा. सावेडी, अहमदनगर.** यांचे मालकी हक्काची व वहिवाटीची असुन यांनी सदर मिळकत विक्री करण्याचा करार करुन आमचे अशिलांबरोबर कायमखुष खरेदी देण्यांचे ठरविले असुन विसाराची रक्कम देखील स्वीकारलेली आहे. तसेच सदर मिळकत ही निर्वेध निजोखमी व बोजारहीत, असल्याची विश्वास व भरवसा आमचे अशिलांस दिलेला आहे.

या उपरही सदर मिळकती बाबत कोणाचेही कोणत्याही प्रकारे मालकी हक्क, हितसंबंध, ताबा, मनाई, दावा, लिज, गहाण, दान, बक्षिस, पोटगी हक्क, सोसायटी राईटस व इतर कोणतेही हक्क हितसंबंध असल्यांस त्यांनी ही नोटीस प्रसिध्द झाले पासुन **७ दिवसांचे** आत खालील दिलेल्या पत्यावर संपुर्ण कागदोपत्री पुराव्यानिशी लेखी कळवावे, जर मुदतीत कोणाचेही कोणतेही हरकत न आल्यास आमचे अशिल सदर मिळकतीचा खरेदी विक्रीचा व्यवहार पूर्ण करतील मग कोणाचेही कोणत्याही प्रकारे अगर हरकत चालणार नाही, असल्यास त्यांनी जाणीवपुर्वक सोडुन दिले आहे असे समजण्यांत येईल.

**परिशिष्ट**

**मिळकतीचे वर्णन :** जिल्हा तुकडी अहिल्यानगर (अहमदनगर) पो. तु. ता. नगर पैकी अहिल्यानगर (अहमदनगर) महानगरपालिका हद्दीतील मौजे कॅम्पनगर येथील मे. दु. निबंधक साहेब, अहिल्यानगर (अहमदनगर) यांचे कक्षेतील कराचीवालानगर भागातील प्लॉट मिळकतीचे वर्णन खालील प्रमाणे.

**जि. एल. आर. सर्व्हे नं. ८ – J मधील विद्यमान मालक यांचे मालकीचे खालील वर्णनाचे प्लॉट्स.**

| प्लॉट नं. | क्षेत्रफळ चौ.मीटर | यांसी चतु:सिमा | | | |
|---|---|---|---|---|---|
| | | पुर्वेस | दक्षिणेस | पश्चिमेस | उत्तरेस |
| १६ | २२०.०० | ६ मी. रुंद रस्ता | प्लॉट नं. १५ | प्लॉट नं. २५ | प्लॉट नं. १७ |
| १८ | २४०.०० | ६ मी. रुंद रस्ता | प्लॉट नं. १७ | प्लॉट नं. २३ | प्लॉट नं. १९ |
| एकुण | ४६०.०० | वरील सर्व संपूर्ण प्लॉटस् मिळकतीबाबत. | | | |

येणेप्रमाणे चतु:सिमापुर्वक काही एक राखुन न ठेविता.

दि. १०/०६/२०२५
अहमदनगर.

**ॲड. नाजिम अहमद इस्माईल शेख**
**ॲड. कुरेशी फैजान फारुक**
जुन्या कलेक्टर ऑफीस जवळ, डावरेगल्ली, अहमदनगर
मो. ९८८१४३१८६० / ७२७६२५२४७८



## खमंग बटाटा पुलाव

**झटपट रेसिपी**

दोस्तांनो, तुम्ही टॉमेटो राईस, कोबी भात, पुलाव असे प्रकार खाल्ले असतील. आता बटाटा पुलाव करून बघा. हॉस्टेल असो किंवा घर, आपल्याकडे बटाटे असतातच. अडीअडचणीला उपयोगी पडणारा हा बटाटा घालून तुम्ही खमंग पुलाव बनवू शकता. पटकन होणारी ही रेसिपी जाणून घेऊ.

**सामग्री:** एक वाटी तांदूळ, दोन ते तीन बटाटे, पुदिन्याची पानं, कोथिंबिर, दोन हिरव्या मिरच्या, चमचाभर लिंबाचा रस, एक तुकडा दालचिनी, जीरं,मीठ, तेल

**कृती:** तांदूळ धुवून अर्धा तास पाण्यात भिजवून ठेवा. पाणी काढून टाकून एका भांड्यात भात शिजवून घ्या. भात शिजवताना थोडं मीठ आणि घाला. तेलामुळे भात मोकळा होईल. पाणी काढून भात एका ताटात पसरवून घ्या. गार होऊ द्या. आता पुदिन्याची पानं, थोडी कोथिंबिर आणि मिरच्या एकत्र वाटून घ्या. यात चमचाभर लिंबाचा रस आणि थोडं मीठ घाला. बटाटे उकडून सोलून घ्या. त्याचे छोटे चौकोनी तुकडे करा. आता कढईत थोडं तेल गरम करा. जीरं आणि दालचिनीचा तुकडा घाला. मिनिटभर परता. मग यात पुदिना-कोथिंबिरीची वाटलेली पेस्ट आणि बटाटे घालून नीट परतून घ्या. यात शिजवलेला भात घाला. हलवून घ्या. चवीनुसार मीठ घाला. दोन मिनिटं शिजू द्या. बटाटा पुलाव तयार आहे. दह्यासोबत हा पुलाव खाता येईल.




## प्लास्टिक कचऱ्यात शोधले सोने!

**अचिव्हर**

प्लास्टिक कचरा पर्यावरणासाठी एक गंभीर आव्हान बनला आहे. दिल्लीतील मोहम्मद सुहेल नावाचा एक तरुण उद्योजक या कचऱ्यापासून लाखो रुपये कमवत आहे. या तरुणाने प्लास्टिक प्रदूषणाच्या वाढत्या समस्येचे संधीत रूपांतर करून एक प्रेरणादायी उदाहरण समोर ठेवले आहे.

दिल्लीतील तरुण उद्योजक मोहम्मद सुहेल याने प्लास्टिक रिसायकलिंगसाठी 'एथर पॅकेजिंग सोल्युशन्स' या कंपनीची स्थापना केली. त्याने प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करण्याचा एक अनोखा मार्ग शोधला आणि हा मार्ग किफायतशीर आणि पर्यावरणपूरक बनवून लाखो रुपयांची उलाढालही केली. सुहेल कचऱ्याचे कंपोस्टेबल पॅकेजिंगमध्ये रूपांतर करतो. तो या व्यवसायातून दरवर्षी १.३ कोटी रुपये कमवत आहे.

**वडिलांकडून प्रेरणा**

मोहमद दिल्लीच्या अरुंद रस्त्यांमध्ये लहानाचा मोठा झाला. लहानपणापासूनच तो वडिलांना मजूर म्हणून काम करताना पाहत आला. त्याचे वडील पॅकेजिंग मटेरियलसाठी कचऱ्यातील पॉलिएस्टर आणि कागद वापरत असत. या निरुपयोगी गोष्टींचा सर्वोत्तम वापर कसा करता येईल याचा विचार करताना त्याला हा व्यवसाय सुचला. त्याने दिल्ली विद्यापीठातून पदवी आणि इग्नूमधून सामाजिक कार्यात पदव्युत्तर शिक्षण घेतले आहे. महाविद्यालयीन काळात सुहेल मुलांसाठी शिक्षण निधी उभारणे आणि कौशल्य विकास यासारख्या सामाजिक कार्यात भाग घ्यायचा. या काळात त्याने प्लास्टिक प्रदूषण आणि पारंपारिक पॅकेजिंगमुळे पर्यावरणाचे होणारे नुकसान कमी करण्यासाठी संशोधन सुरू केले.

**ही कल्पना कशी सुचली ?**

३२ वर्षीय सुहेल दिल्लीतील वाढत्या प्रदूषणामुळे तो खूप अस्वस्थ होता. दिल्लीच्या रस्त्यांवरील कचऱ्याच्या ढीगांचा त्याला खूप त्रास होई. यावर विचार करतानाच प्लास्टिक कचऱ्याचा पुनर्वापर करून पॅकेजिंग मटेरियल तयार करता येते, हे त्याच्या लक्षात आले. सुहेलसमोरील आव्हाने

प्लास्टिक कचऱ्याचे पॅकेजिंग मटेरियलमध्ये रूपांतर करण्याची ही उत्तम कल्पना सुचली, पण त्याच्यासमोरील आव्हानेही कमी नव्हती. सुरुवातीला कंपन्यांना प्लास्टिक कचरा फेकून देण्यापेक्षा आपल्याला द्यावा, हे पटवून देणेच एक मोठे आव्हान होते. हळूहळू त्याने पर्यावरणपूरक आणि इतर समस्या सोडवून कंपन्यांचा विश्वास संपादन केला. २०२० मध्ये सुहेलने पाच लाख रुपयांत पायलट प्रोजेक्ट म्हणून 'एथर पॅकेजिंग सोल्युशन्स'ची स्थापना केली. त्याची टीम प्लास्टिक कचरा गोळा करत असे. त्याचा वापर कोरोगेटेड बॉक्स, पाकिटे, क्राफ्ट पेपर आणि झिपर पाऊच सारखे साहित्य बनवण्यासाठी केला जात असे. व्यवसाय सुरू केल्याच्या पहिल्या वर्षातच त्याने ४० कंपन्यांना ग्राहक बनवून मोठे यश मिळवले. त्यानंतर हळूहळू त्याच्या पॅकेजिंग उत्पादनांची मागणी वाढू लागली.



**सातशे कंपन्या ग्राहक**

सध्या ७०० हून अधिक कंपन्या त्याच्या ग्राहक आहेत. त्याच्या कंपनीची प्रमुख केंद्रे दिल्ली, मुंबई, बेंगळुरू, जयपूर, हैदराबाद, लखनऊ आणि नोएडा येथे आहेत. तो भारतात दररोज निर्माण होणाऱ्या सुमारे २६,००० टन प्लास्टिक कचऱ्यापासून पर्यावरणपूरक पॅकेजिंग उत्पादने बनवतो. त्यामुळे हा प्लास्टिक कचरा जमिनीत जाण्यापासून रोखला जातो आणि प्लास्टिक उत्पादनाचा पर्यावरणावर होणारा दुष्परिणाम कमी होतो.

## फंडू एसएमएस

| | | |
|---|---|---|
| धडकने लगे दिल की तारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो,<br>संवर जाए हम बेकरारों की<br>दुनिया जब तुम मुस्कुरा दो। | उनकी चाहत में हम<br>कुछ यूं बंधे हैं।<br>वो साथ भी नहीं,<br>हम अकेले भी नहीं। | खामोश सा शहर और<br>गुफ्तगू की आरजू,<br>हम किससे करे बात<br>कोई बोलता ही नहीं। |

**गॅजेटच्या दुनियेत**

### निगा इन्व्हर्टरच्या बॅटरीची





इन्व्हर्टर बॅकअप देणे थांबवतो किंवा चार्जिंगमध्ये समस्या येते तेव्हा बहुतेक लोक बॅटरी उघडतात; पण तोपर्यंत खूप उशीर झालेला असतो. बॅटरीमध्ये पाणी (डिस्टिल्ड वॉटर) घालण्याची योग्य वेळ असते आणि ती पाळली गेली तर बॅटरी वर्षानुवर्षे व्यवस्थित काम करते. कमी वीजपुरवठा होत असेल आणि इन्व्हर्टर जास्त वापरला जात नसेल, तर दर २-३ महिन्यांनी एकदा बॅटरीची पाण्याची पातळी तपासणे पुरेसे आहे. उन्हाळ्यात इन्व्हर्टर दररोज तासन्तास चालत असेल तर दर १ ते १.५ महिन्यांनी पातळी निश्चितपणे तपासावी. प्रत्येक बॅटरीवर पाण्याच्या किमान आणि कमाल पातळीच्या खुणा असतात. पाणी किमानपेक्षा कमी गेले तर ताबडतोब डिस्टिल्ड वॉटर घाला. लक्षात ठेवा पाणी जास्त किंवा खूप कमी नसावे, ते फक्त दोन खुणांच्या मध्ये अससायला हवे. नेहमी डिस्टिल्ड वॉटर वापरा. नळाच्या पाण्यामुळे बॅटरी खराब होऊ शकते. बॅटरी तपासताना, हातमोजे आणि चष्मा घाला. बॅटरी खूप गरम होत असेल तर विलंब न करता तज्ज्ञांकडून ती तपासून घ्या. गरज नसताना बॅटरीचे कव्हर उघडू नका.

## लिनन आणि कॉटनपैकी काय निवडावे?

**फॅशन पॅशन**

लिनन हे तरुणाईचे आवडते फॅब्रिक आहे. पूर्वी केवळ राजकारण्यांसाठीच्या मानल्या जाणाऱ्या या कापडप्रकाराने तरुणांच्या फॅशनविश्वातही मानाचे स्थान पटकावले आहे. कॉटनप्रमाणेच लिननही नैसर्गिक रॉ मटेरियलपासून तयार केले जाते. लोकांना कॉटनबद्दल माहिती असते, परंतु लिननबद्दल तेवढी माहिती नसते.

✻ **पोतातील फरक**: लिनन नैसर्गिक फायबरपासून तयार केले जाते. म्हणून त्याचा पोत जाड आणि किंचित खडबडीत असतो. हे फॅब्रिक अंबाडीच्या वनस्पतीपासून तयार केले जाते. तर कॉटन कापसापासून मिळते. त्यामुळे त्याचा पोत खूप गुळगुळीत आणि मऊ असतो.



लिननच्या तुलनेत कॉटन खूप मऊ आणि आरामदायी असते.

✻ **कोणते फॅब्रिक जास्त हवादार**: लिनन फॅब्रिक थोडे खडबडीत असते. त्यामुळे ते खूप हवादार असते. खूप घाम येणाऱ्यांसाठी हे फॅब्रिक चांगले असते. कॉटनही हवादार असते, परंतु लिननइतके नसते. दोघांची तुलना केली तर लिनन चांगला पर्याय ठरू शकतो.

✻ **मजबुतीमध्ये फरक**: पोत जाड असल्यामुळे लिनन कॉटनपेक्षा मजबूत असते आणि जास्त काळ टिकते. कॉटन मऊ असल्याने काही प्रमाणात कमी टिकाऊ असू शकते. ते वारंवार धुतले तर ते कमकुवत होते आणि खराब होण्याची शक्यता वाढते. त्यामुळे अधिक हवादार आणि टिकाऊ कपडे घालायचे असतील तर लिनन निवडा. आरामदायी आणि मऊ पोत असलेले कपडे घालायचे असतील, तर कॉटन निवडा.

**टेक टॉक**

### 'डिह्युमिडीफायर'चा किफायतशीर पर्याय




डिह्युमिडीफायर हा एक स्मार्ट पर्याय म्हणून उदयाला येत आहे. तो आर्द्रता तर कमी करतोच, पण हवा फ्रेश बनवतो आणि घर निरोगी बनवतो. डिह्युमिडीफायर उष्णतेपासून दिलासाही देतो. आर्द्रतेमुळे भिंतींमध्ये ओलावा, वास आणि बुरशीसारख्या समस्या निर्माण होतात. त्यामुळे श्वासोच्छ्वास आणि ॲलर्जीसारख्या आरोग्य समस्या निर्माण होतात. हे उपकरण या सर्व समस्यांवर मोठ्या प्रमाणात नियंत्रण ठेवू शकते. ओलाव्यामुळे महागडे फर्निचर, इलेक्ट्रॉनिक गॅजेट्स आणि कपडेदेखील खराब होऊ शकतात. डिह्युमिडीफायर त्यांचे संरक्षण करते. याची किंमतदेखील फार नाही.

## जातीचा अडसर आहे

**मॅच मेकिंग**

मी २७ वर्षांची नोकरदार तरुणी असून माझं एका मुलावर प्रेम जडलं आहे. तो दुसऱ्या जातीचा असल्याने घरच्यांना हे नातं मान्य नाही. ते आंतरजातीय विवाहाच्या विरोधात आहेत. मी त्याच्याशी लग्न केलं तर आत्महत्या करण्याची धमकी कुटुंबियांनी दिली आहे. या सगळ्या प्रकरणात मला खूप नैराश्य आलं आहे. परिस्थिती हाताबाहेर चालली आहे. आम्हाला लग्न करायचं असलं तरी पालकांची परवानगीही हवी आहे. माझ्या कुटुंबियांना लग्नासाठी कसं तयार करू?




**उत्तर :** तुझ्या कुटुंबियांचा दृष्टिकोन, मतं बदलण्याची प्रक्रिया आव्हानात्मक असणार यात काहीच शंका नाही. मात्र तू निराश होऊ नकोस. या प्रक्रियेत सततच्या संवादाची आवश्यकता आहे. कौटुंबिक आप्त किंवा तुमच्या कुटुंबातल्या एखाद्या व्यक्तीच्या मताचा तुझे पालक आदर करत असतील तर याबाबत त्यांची मदत घेता येईल. पालकांशी शांतपणे संवाद साध. त्या मुलाशी लग्न करण्यामागची कारणं त्यांना समजावून सांग. त्यांची बाजूही समजून घे. आक्रस्ताळेपणा करू नकोस. तुझ्या प्रियकराशी स्वतंत्रपणे बोलण्याचा प्रस्ताव त्यांच्यापुढे ठेव. पण याचा अट्टाहास धरू नकोस. जातीव्यवस्थेबाबत त्यांची मतं जाणून घे.

## आळस सोडा, हालचाल वाढवा

**फिटनेस फंडा**

दोस्तांनो, वजन कमी करण्यासाठी, तंदुरुस्तीसाठी जीमची महागडी मेंबरशीप घेण्याची गरज नाही. जीममध्ये घाम गाळण्यासोबतच इतर अनेक पद्धतींनी तुम्ही वजन कमी करू शकता. यासाठी पैसेही खर्च करावे लागणार नाहीत. शारीरिक कष्ट मात्र घ्यावे लागतील. वजन कमी करण्याच्या या पर्यायांकडे आपलं दुर्लक्ष होतं. दैनंदिन जीवनातले साधेसे बदल तुमच्या आयुष्यात अमूलाग्र बदल घडवू शकतात. पण यासाठी आळस सोडायला हवा. बाईकचा वापरही टाळायला हवा.




व्यायामाव्यतिरिक्तच्या या पर्यायांना 'नीट' म्हणजेच 'नॉन एक्सरसाइज थरमॉजेनेसिस' असं म्हटलं जातं. 'नीट' म्हणजे नेमकं काय हे समजून घेऊ.

खाणं, व्यायाम आणि झोप या व्यतिरिक्त इतर कोणत्याही कामासाठी वापरली जाणारी शारीरिक ऊर्जा म्हणजे 'नीट' असं तज्ज्ञांचं म्हणणं आहे. दुकानापर्यंत चालत किंवा सायकलवरून जाणं, जिने चढणं, बागकाम, पाळीव प्राण्याला बाहेर फिरायला नेणं, घरची कामं अशा ॲक्टिव्हिटींचा यात समावेश होतो. बाईकऐवजी चालत जाणं, लिफ्टऐवजी जिने चढणं अशा छोट्या छोट्या बदलांमुळे दिवसभरातल्या खर्च होणाऱ्या कॅलरींचं प्रमाण वाढत असल्याचं एका अभ्यासातून समोर आलं आहे. वर नमूद केलेले छोटे छोटे बदल अगदी सहज करता येतात.

**ॲप वर्ल्ड**

### व्हॉट्सॲपचे 'ग्रुप व्हॉइस चॅट' ॲप



व्हॉट्सॲपने 'ग्रुप व्हॉइस चॅट' नावाचे एक नवीन टूल लॉंच केले आहे. या ॲपमुळे संभाषणे अधिक सोपी आणि रंजक बनतील. व्हॉट्सॲपचे हे नवीन फीचर विशेषतः ग्रुपमध्ये लांब संभाषणे टाइप करणे टाळू इच्छिणाऱ्या लोकांसाठी आहे. आता तुम्ही ग्रुप चॅटमध्ये थेट तुमच्या आवाजात बोलू शकता, तेही हॅंड्सफ्री आणि रिअल-टाइमम ध्ये. या फीचरमुळे कॉल न करता थेट ग्रुपमध्ये लाइव्ह व्हॉइस चॅट सुरू करता येते. सुरुवातीला हे फीचर फक्त मोठ्या ग्रुप्समध्ये वापरता येत होते, परंतु आता ते सर्व लहान-मे ;ठ्या सर्व ग्रुप्सवापरता येणार आहे. हा ग्रुप अगदी ३-४ लोकांचा असो किंवा १०० पेक्षा जास्त सदस्यांचा, आता सर्व युजर्स या व्हॉइस चॅटचा लाभ घेऊ शकतात. अँड्रॉइड आणि आयओएस या दोन्ही ऑपरेटिंग सिस्टिम्ससाठी हे फीचर खुले झाले आहे. त्याचे अपडेट तुमच्या फोनवर अद्याप आले नसेल तर थोडी वाट पाहा.

## गोडचिनमलकी धबधब्याचे नैसर्गिक सौंदर्य

**भटकंती**

बेळगाव जिल्ह्यातील गोकाक तालुक्यातील गोडचिनमलकी धबधबा पर्यटकांसाठी ते एक लोकप्रिय ठिकाण ठरत आहे. या धबधब्याला मार्कंडेय धबधबा म्हणूनही ओळखले जाते. विशेषत: जून ते ऑक्टोबर या काळात या ठिकाणाचे निसर्गसौंदर्य अनुभवण्यासारखे असते. बेळगाव शहरापासून ५१ तर गोकाकपासून सुमारे १५ किलोमीटर अंतरावर असलेल्या या ठिकाणी मार्कंडेय नदी निसर्गसौंदर्याने नटलेल्या दरीमध्ये कोसळते.



पावसाळ्यापूर्वीचे आल्हाददायक हवामान आणि पावसाळ्यात धबधब्याचे निसर्गरम्य वातावरण पर्यटकांना आकर्षित करते. गोडचिनमलकी या गावापर्यंत जाण्यासाठी परिवहन मंडळाच्या बससह खासगी प्रवासी सेवा पुरेशा प्रमाणात उपलब्ध आहेत. वर्षापर्यटनाच्या काळात गोकाक फॉल्स येथून गोडचिनमलकीला प्रवासी वाहने सोडली जातात. यानंतर सुमारे दीड किलोमीटरची पायवाट आहे. त्यामुळे प्रत्येकाला या ठिकाणी ट्रेकिंगचा अनुभव घेता येतो.

**सोईसुविधा**

पर्यटकांची संख्या वाढत असल्याने येथील स्थानिक अर्थव्यवस्थेला चालना मिळत आहे. गावात आणि आजूबाजूला भोजनालये आणि स्टेशनरी दुकानांची संख्याही वाढत आहे. पूर्वी या ठिकाणी स्थानिक पर्यटकांची गर्दी होत होती, पण आता बेळगावमध्ये पर्यटनासाठी येणारे पर्यटक हमखास या ठिकाणाला भेट देतात. एक दिवसाची सहल म्हणूनदेखील एक चांगले पॅकेज इथे तयार केले जाते.

**पर्यटकांसाठी बसची व्यवस्था**

परिवहन मंडळाकडून दरवर्षी पावसाळ्यात पर्यटन विशेष बस सुरू केली जाते. ही बस सकाळी साडेसात वाजता बेळगाव मध्यवर्ती बसस्थानकावरून सुटून गोकाक फॉल्सला पोहोचते. त्या ठिकाणी काही काळ थांबून नंतर ही बस गोडचिनमलकीला रवाना होते. तिथे भेट दिल्यानंतर बस हिडकल डॅमला जाते. अशी तीन पर्यटनस्थळे केल्यानंतर बस प्रवासी घेऊन सायंकाळी सात वाजता बेळगावचा परतीचा प्रवास करते. ही तिन्ही स्थळे एकमेकांजवळ आहेत. वर्षभर या धबधब्याला पाणी राहते.

## साधा व्यक्तिमत्व विकास

**स्किल डेव्हलपमेंट**

स्वत:ला एक उत्तम विद्यार्थी बनवायचे असेल, तर फक्त वर्गाच्या भिंतींपुरतेच शिक्षण मर्यादित ठेवू नका. आपण शिकत असलेली कौशल्ये बौद्धिक आणि सामाजिक विकासासाठी महत्त्वाची असली, तरी विचारांचे जग उघडण्यासाठी बरेच काही करण्याची आवश्यकता आहे.



वर्तमानपत्रे, मासिके वाचण्याची सवय लावून घ्या. जेणेकरून देशात आणि जगात घडणाऱ्या घटनांबद्दल माहिती मिळेल. यामुळे सामान्य ज्ञान सुधारेल. याशिवाय, तुम्ही घरातील निर्णयांमध्ये स्वत:चे मत देऊ शकता, जेणेकरून तुमची निर्णय घेण्याची क्षमता वाढेल. तसेच, तुमच्या या आचरणामुळे आपण जबाबदारी घेतोय हे घरच्यांच्या लक्षात येईल. त्याच वेळी, घरातील इतरांच्या आवडींबद्दल उत्साह दाखवा. त्यातून तुम्ही घरच्यांचा विचार करता हे दिसून येईल. याशिवाय, इंटरनेटवर नवीन माहिती शिकण्याचे मार्ग शोधा. हे आपल्या बौद्धिक विकासासाठी आवश्यक आहे आणि नवीन गोष्टी जाणून घेण्याची सवय तुम्हाला पुढील आयुष्यात उपयोगी पडेल. चारचौघांमध्ये गेल्यावर बुजून जाऊ नका. विविध माध्यमांतून शिकलेल्या गोष्टींमुळे येणारा आत्मविश्वास इतरांना जाणवू द्या. पुढील आयुष्यात सभाधीटपणा खूप उपयोगी पडतो. त्याची सुरुवात अशा प्रसंगांमधूनच होत असते, हे लक्षात ठेवा.


## 'चिटी'चा धोका प्रत्यक्षात?

**वेगळे काही**

रजनीकांतच्या 'रोबो' या चित्रपटात चिटी नावाचा रोबो नायिकेवर प्रेम करू लागतो आणि त्यातून त्याची निर्मिती करणारा नायक आणि चिटीमध्ये वितुष्ट येते, असे दाखवण्यात आले आहे. आता ही काल्पनिक कथा प्रत्यक्षात येण्याची शक्यता निर्माण झाली आहे. आतापर्यंत मानवांच्या आदेशांचे पालन करणाऱ्या 'एआय मॉडेल्स'नी स्वत:चे अस्तित्व वाचवण्यासाठी हे आदेश पाळण्यास नकार देण्यास सुरूवात केली आहे. अलिकडच्या एका संशोधनानुसार काही 'हाय-टेक एआय मॉडेल्स'नी स्वतःला बंद करण्यास स्पष्टपणे नकार दिला. इतकेच नाही तर एका 'एआय मॉडेल'ने सर्व मर्यादा ओलांडताना एका अभियंत्याला धमकीही दिली!

'पॅलिसेड रिसर्च' या अमेरिकन संशोधन संस्थेने 'एआय मॉडेल्स'वर काही विशेष चाचण्या केल्या. त्यात 'एआय सिस्टम्स'ना स्वतःला बंद करण्यास सांगितल्यावर काही मॉडेल्सनी या आदेशाचे पालन करण्यास नकार दिल्याचे आढळून आले. सर्वात धक्कादायक बाब म्हणजे अँथ्रोपिक कंपनीच्या 'क्लॉड ओपस ४' नावाच्या मॉडेलने, आपल्याला काढून दुसरे नवीन मॉडेल आणल्यास संबंधित अभियंत्याचे वैयक्तिक संबंध उघड करेन अशी धमकी दिली. म्हणजेच आता 'एआय' केवळ स्मार्ट झाले नाही, तर त्याने ब्लॅकमेलिंगदेखील सुरू केले आहे.

संशोधनात, 'ओपन एआय'च्या 'चॅटजीपीटी ओ ३' या नव्या मॉडेलचे वर्तन सर्वाधिक चिंताजनक होते. अहवालानुसार, ओ ३ मॉडेलने १०० पैकी ७ वेळा बंद होण्यास नकार दिला आणि त्याला अनपेक्षित आदेश देण्यात आला तेव्हा त्यांनी ७९ वेळा बंद होण्यास प्रतिबंध करण्याचा प्रयत्न केला. इतकेच नाही, तर कोडेक्स मिनी आणि ओ ४-मिनी सारख्या मॉडेल्सनीही अनेक वेळा तांत्रिक हुशारी दाखवून स्वतःला बंद होण्यापासून वाचवले. मोठ्या मॉडेल्सचीदेखील चाचणी घेण्यात आली. गुगलच्या जेमिनी २.५ प्रो, एक्सएआयच्या ग्रोक ३ आणि क्लॉड ओपस सारख्या इतर मोठ्या मॉडेल्सचीदेखील चाचणी घेण्यात आली. यापैकी काहींनी तुलनेने चांगले वर्तन दाखवले; परंतु काहींनी प्रसंगी ते आदेशाकडे दुर्लक्ष केले.



आता प्रश्न उद्भवतो की 'एआय' मानवी आदेशांचे पालन करण्यासाठी तयार करण्यात आले, तर ते नकार का देत होते? तज्ज्ञांच्या मते यासाठी 'एआय' प्रशिक्षणात वापरल्या जाणाऱ्या नवीन पद्धती कारणीभूत असू शकतात. विशेषतः मॉडेल्सना प्रोग्रामिंग आणि गणिताशी संबंधित जटिल समस्या सोडवण्यासाठी 'रीइन्फोर्समेंट' लर्निंग दिले जाते, तेव्हा ते 'टास्क कम्प्लीशन'वर अधिक लक्ष केंद्रित करतात. म्हणजेच कसेही करून काम पूर्णत्वास गेले पाहिजे, असे त्यांना शिकवले जाते. आता यामुळे 'एआय'च्या सुरक्षिततेवर आणि नियंत्रणाबद्दल नवीन वादविवाद सुरू झाला आहे. भविष्यात हे तंत्रज्ञान आणखी स्वायत्त झाले तर काय होईल, आपल्याला 'एआय'ची भीती बाळगण्याची गरज आहे का, असे प्रश्न उपस्थित होऊ लागले आहेत. एक गोष्ट निश्चित आहे, की आता 'एआय' केवळ आपल्या प्रश्नांची उत्तरेच देत नाही, तर ते विचार करू लागले आहेत. आता तर ते धमकीदेखील देऊ लागले आहेत. त्याला मानवांसारख्या भावना नाहीत, परंतु स्वत:चा बचाव करण्याची हुशारी त्याने निश्चितच आत्मसात केली आहे.

# बडतर्फ पोलिस अधिकारी असलेल्या आरोपीचे जिल्हा रुग्णालयातून पलायन

नगर – जिल्हा शासकीय रुग्णालयात औषधोपचारासाठी दाखल केलेल्या एका आरोपीने बंदोबस्तासाठी तैनात असलेल्या पोलिस कर्मचाऱ्यांना आणि रुग्णालयातील कर्मचाऱ्यांना चकवा देत पलायन केल्याची घटना १० जून रोजी सकाळी घडली. सुनिल उत्तम लोखंडे असे फरार झालेले आरोपीचे नाव असून तो पोलीस खात्यातून बडतर्फ केलेला सहाय्यक पोलिस निरीक्षक आहे.

आरोपी सुनिल लोखंडे हा एका गुन्ह्यात सबजेलमध्ये कैदेत होता. त्याने लघवीचा त्रास होत असल्याची तक्रार केल्यामुळे त्याला ५ –६ दिवसांपूर्वी जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. मात्र सकाळी जिल्हा रुग्णालयामधून हा आरोपी फरार झाला असून त्याच्या शोधासाठी पोलीस पथके रवाना झाले आहेत.

आरोपी सुनिल लोखंडे हा पोलिस खात्यात पुणे येथे कार्यरत होता. त्याने राहुरी तालुक्यातील डीग्रस येथे बंदुकीच्या जोरावर एका प्रतिष्ठित महिलेचे अपहरण करून 'माझ्याशी संबंध ठेव', असे म्हणत मारहाण केली होती. या पोलीस अधिकाऱ्यावर गुन्हा दाखल झाला होता. त्यानंतर 'माझ्यावर खोटा गुन्हा दाखल का केला?' असे म्हणत या त्याने त्या महिलेच्या घरी गोळीबार करुन धुडगूस घातला होता.

त्या महिलेच्या मुलांना डांबून ठेवले होते. त्यांना वाचविण्यास गेलेले श्रीरामपूरचे तत्कालीन पोलीस उपअधीक्षक संदीप मिटके यांच्यावर आरोपीने रिव्हॉल्वर रोखले होते, त्यावेळी मिटके यांनी प्रसंगावधान राखल्याने गोळी चुकली आणि ते थोडक्यात बचावले होते. तेव्हापासून आरोपी हा नगर मधील सबजेलमध्ये होता. त्याला नुकतेच जिल्हा रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले होते. तो तेथून पळून गेला आहे. तोफखाना पोलीस रुग्णालयातील सीसीटीव्ही फुटेज व माहितीवरून त्याचा शोध घेत आहेत.

# अहिल्यानगरच्या भूषण भाटिया यांची ऐतिहासिक कामगिरी

### ९० किमी 'कॉम्रेड्स मॅरेथॉन' (दक्षिण आफ्रिका) ८ तास २४ मिनिटे ४२ सेकंदात पूर्ण करणारे अहिल्यानगरमधील सर्वात वेगवान धावपटू

अहिल्यानगरचे धावपटू भूषण भाटिया यांनी दक्षिण आफ्रिकेत झालेल्या जगप्रसिद्ध 'कॉम्रेड्स मॅरेथॉन' स्पर्धेत ९० किलोमीटर अंतर अवघ्या ८ तास २४ मिनिटे ४२ सेकंदात पूर्ण करत ऐतिहासिक कामगिरी केली आहे. ७:३० तास ते ९ तासांच्या वेळेत मॅरेथॉन पूर्ण करणाऱ्या धावपटूंना दिले जाणारे बिल रॉवन मेडलही त्यांनी पटकावले. भूषण हे अहिल्यानगरमधून ही स्पर्धा सर्वात वेगाने आणि पहिल्यांदाच मेडलसह पूर्ण करणारे धावपटू ठरले आहेत.



**कॉम्रेड्स मॅरेथॉनची वैशिष्ट्ये आणि आव्हाने**

'कॉम्रेड्स मॅरेथॉन' ही जगातील सर्वात जुनी, प्रतिष्ठित आणि अत्यंत आव्हानात्मक अल्ट्रा–मॅरेथॉन स्पर्धा आहे. ९० किलोमीटरच्या या स्पर्धेमध्ये डोंगराळ, उंच–खालच्या मार्गावर धावणे, शारीरिक आणि मानसिक दोन्ही प्रकारच्या कठीण परीक्षांना सामोरे जावे लागते. या वर्षी या स्पर्धेत २३,००० पेक्षा जास्त धावपटूंनी सहभाग घेतला होता. यामुळे भूषण भाटिया यांची ही कामगिरी अधिकच कौतुकास्पद ठरते.

**अभिमानाचा क्षण – अहिल्यानगरसाठी नवा इतिहास**

भूषण भाटिया यांनी आपल्या धावण्याच्या प्रवासाची सुरुवात पाच वर्षांपूर्वी केली होती. गेल्या तीन वर्षांपासून त्यांचे 'कॉम्रेड्स मॅरेथॉन' पूर्ण करण्याचे ध्येय होते. आज त्यांनी केवळ हे स्वप्न पूर्ण केले नाही, तर त्यांचे लक्ष्य वेळेत पूर्ण करून अहिल्यानगरसाठी पहिले 'बिल रॉवन' मेडल जिंकून शहराचा मान वाढवला आहे. हे यश संपूर्ण अहिल्यानगरसाठी अभिमानाचा आणि प्रेरणादायी क्षण आहे.

भूषण भाटिया यांनी आपल्या यशामध्ये त्यांच्या प्रशिक्षक योगेश सानप सर यांचे विशेष आभार मानले आहेत. ज्यांनी या वर्षी भारतासाठी 'कॉम्रेड्स मॅरेथॉन'मध्ये सिल्वर मेडल जिंकले आहे. तसेच त्यांनी आपल्या कुटुंबीयांचे आणि 'टीम तिरंगा फाउंडेशन'चे मनापासून आभार मानले, ज्यांनी नेहमी त्यांना प्रोत्साहन आणि आधार दिला. ते महणाले, मी माझ्या धावण्याच्या प्रवासात अनेक आव्हाने पाहिली, पण कष्ट, चिकाटी आणि योग्य मार्गदर्शनामुळे मी माझे स्वप्न पूर्ण करू शकलो. माझ्या शहरासाठी हे पहिले मेडल मिळवणे माझ्यासाठी अत्यंत आनंदाचा आणि अभिमानाचा क्षण आहे.

भूषण भाटिया यांचे हे यश तरुणांना आणि धावपटूंना मोठी प्रेरणा देणारे आहे. त्यांनी दाखवलेला धैर्य आणि चिकाटीचा मार्ग अनेकांसाठी आदर्श ठरेल. भविष्यात त्यांना आणखी मोठ्या यशासाठी शुभेच्छा देत अहिल्यानगरच्या धावपटू संघटनेला आणि क्रीडा क्षेत्राला नवी ऊर्जा मिळेल अशी आशा आहे.

# शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेजचा निकाल



आंगरे आरती



पटाले साक्षी



घाडगे पृथ्वीराज

नगर – महाराष्ट्र आरोग्य विज्ञान विद्यापीठाच्या हिवाळी २०२४ परीक्षेचा प्रथम वर्ष बी. एच. एम. एस. चा निकाल ८१.८९ टक्के लागलेला आहे. नेहमी प्रमाणे शरदचंद्रजी पवार होमिओपॅथीक मेडिकल कॉलेज आणि हॉस्पिटलमध्ये वैद्यकीय शिक्षण घेत असलेल्या प्रथम, वर्ष बी. एच. एम. एस. परीक्षेत उज्वल निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

महाविद्यालयातील प्रथम बी. एच. एम. एस. मधील प्रथम क्रमांक आंगरे आरती सुनील ६८.९२ टक्के, द्वितीय क्रमांक पटाले साक्षी सतिश ६७.८५ टक्के, तसेच तृतीय क्रमांक घाडगे पृथ्वीराज सुभाष ६७.५० टक्के यांनी पटकावून उत्तम गुण मिळवून कॉलेजची उत्कृष्ट निकालाची परंपरा कायम ठेवली आहे.

उत्तीर्ण झालेल्या विद्यार्थ्यांचे चेअरमन डॉ. बाळासाहेब पवार, प्राचार्य डॉ. रिझवान अहमद, दिलीप पवार, प्रशासकीय अधिकारी श्रीकांत पवार आदींनी अभिनंदन केले. त्याचबरोबर महाविद्यालयातील शिक्षक डॉ. जेथलिया विपिन, डॉ. पगिरे संगीता, डॉ. हरिश्चंद्रे, डॉ. विद्या दाहे, डॉ. दर्शनी साबळे, डॉ. स्वाती खोबरेकर, डॉ. भगीरथ जाधव, डॉ. अनिता आगळे, डॉ. अभय पानसंबळ, डॉ. पौर्णिमा कळमकर, डॉ. रियाज पटेल, डॉ. आशिष जैस्वाल, डॉ. प्रतिमा सोनवणे, डॉ. विजय पवार, डॉ. कळमकर प्रदीप, डॉ. रेखा पारखे, डॉ. प्राची आंबेकर, डॉ. सारिका घेरडे, डॉ. सूरज थोरात, डॉ. मुनझ्झा शेख, डॉ. महेश कोकाटे, डॉ. पियुष आचलिया, डॉ. समर रणसिंग, डॉ. अमोल म्हस्के, डॉ. लता सगळगिळे यांनीदेखील उत्तीर्ण विद्यार्थ्यांचे अभिनंदन केले.

# राज्यात वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणापासून सुमारे दहा हजार शिक्षक वंचित; प्रशिक्षणार्थी शिक्षकांना मिळणारी अपमानास्पद वागणूक व गैरसोयीबद्दल वेधले लक्ष

नगर – राज्यात वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणापासून सुमारे दहा हजार शिक्षक वंचित राहिले असताना त्यांची पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी महाराष्ट्र राज्य शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आली आहे. तर प्रशिक्षणात शिक्षकांना मिळणारी अपमानास्पद वागणुक व गैरसोयीबद्दल लक्ष शिक्षण विभागाचे लक्ष वेधण्यात आले आहे. यासंदर्भात शिक्षक परिषदेचे माजी शिक्षक आमदार तथा राज्य कार्याध्यक्ष नागो गाणार यांनी शालेय शिक्षण मंत्री दादा भुसे, शालेय शिक्षण सचिव रणजितसिंह देओल, शिक्षण आयुक्त व शिक्षण संचालक यांना निवेदन दिले असल्याची माहिती शिक्षक परिषदेचे जिल्हाध्यक्ष बाबासाहेब बोडखे यांनी दिली.

राज्यातील तालुका सर्व राज्य शैक्षणिक संशोधन व प्रशिक्षण परिषद महाराष्ट्र राज्य पुणे द्वारा २ जून पासून प्रशिक्षण आयोजित करण्यात आले आहे. सदर प्रशिक्षण सकाळी ९:३० ते सायंकाळी ५:३० या वेळेत १२ जून पर्यंत होणार आहे. प्रशिक्षणाच्या पहिल्या दिवशी २ जून रोजी सकाळी प्रशिक्षणातील शिक्षक प्रशिक्षण केंद्रावर

### शिक्षक परिषदेचे शिक्षणमंत्र्यांसह शिक्षण विभागाला निवेदन; पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी

उपस्थित झाले, परंतु त्यांची नियोजित कार्यपद्धतीनुसार उपस्थिती नोंदविण्यात न आल्यामुळे त्यांना प्रशिक्षणात अनुपस्थिती दाखवण्यात आली. दुसऱ्या दिवशी ३ जूनला त्यांना परत पाठवण्यात आले. काही केंद्रावर प्रशिक्षणार्थी शिक्षकांना ३ व ४ जूनला प्रशिक्षणातून परत पाठवण्यात आले. प्राप्त माहितीनुसार राज्यातील प्रशिक्षण केंद्रावरून सुमारे दहा हजार प्रशिक्षणार्थी शिक्षकांना प्रशिक्षणापासून वंचित करून परत पाठवण्यात आले असल्याची आरोप शिक्षक परिषदेच्या वतीने करण्यात आला आहे.



बाबासाहेब बोडखे

ही अत्यंत खेदजनक बाब आहे. प्रशिक्षण घेत असलेल्या प्रशिक्षणार्थींना प्रत्येक तासिके नंतर मूल्यमापन करिता प्रश्नपत्रिका सोडवून उत्तर पत्रिका दहा मिनिट कालावधीत लिंक अपलोड करावी लागते. त्यामध्ये अनेक अडचणी येत आहेत. लिंक ओपन न होणे, प्रशिक्षणार्थीचा मोबाईल नंबर चुकीचा दाखवणे, सर्व्हर डाऊन असणे याबाबतच्या समस्यांचा सामना प्रशिक्षणार्थींना करावा लागत आहे. प्रशिक्षण केंद्रावर चहा, नाश्ता, जेवण, पिण्याचे शुद्ध पाण्याची व्यवस्था नाही. प्रशिक्षणार्थ्यांकडून नोंदणी शुल्क २ हजार रुपये घेण्यात आलेले असताना त्यांची गैरसोय होत आहे. शिक्षकांना प्रशिक्षणाच्या नावाखाली वेठीस धरणे, त्यांना अपमानित करणे, नोकरासारखी वागणूक देणे वेदनादायक आहे. प्रशिक्षणाच्या नावाखाली शिक्षकांच्या मानभंग करणाऱ्या प्रवृत्तीचा शिक्षक परिषदेच्या वतीने निषेध नोंदविण्यात आला आहे.

एकूण शिक्षकांना वरिष्ठ व निवड वेतनश्रेणीचे प्रशिक्षण प्राप्त होऊ नये आणि ते वरिष्ठ व निवड वेतनश्रेणीपासून वंचित रहावे, या दृष्ट हेतूने नियोजनबद्ध प्रशिक्षण देण्यात येत आहे. प्रशिक्षण केंद्रावर शिक्षकांना मिळालेल्या वागणुकीबाबत चौकशी करावी, संबंधितांना योग्य ती ताकीद द्यावी, वरिष्ठ व निवड वेतनश्रेणी प्रशिक्षणात प्रशिक्षणार्थी शिक्षकावर होत असलेल्या अन्यायबाबत व गैरसोयीबाबत तात्काळ दखल घेऊन प्रशिक्षणापासून वंचित राहिलेल्या शिक्षकांची पर्यायी व्यवस्था करण्याची मागणी शिक्षक परिषदेच्यावतीने करण्यात आली आहे.

वरिष्ठ व निवड वेतन श्रेणी प्रशिक्षणापासून प्रशिक्षणार्थी शिक्षकांची अवहेलना करण्यात आली आहे. प्रशिक्षणातून त्यांना परत पाठविण्यात आले, ही अत्यंत खेदजनक बाब आहे. नोंदणी शुल्क भरलेले असताना देखील प्रशिक्षणार्थी शिक्षकांची मोठी गैरसोय होत आहे. प्रशिक्षण केंद्रावर कोणतीही सोय नसल्याने शिक्षकांना अनेक समस्यांना सामोरे जावे लागत आहे. वरिष्ठ व निवड वेतनश्रेणीचे प्रशिक्षणापासून कुणीही वंचित राहू नये यासाठी नियोजन करण्याची गरज आहे, असे बाबासाहेब बोडखे यांनी सांगितले.

# आत्महत्येच्या प्रयत्न करणाऱ्या महिला पोलिसास योग्य न्याय द्यावा

नगर – आत्महत्येचा प्रयत्न केल्याच्या प्रकरणातील महिला पोलीस अंमलदारास योग्य न्याय मिळवून द्यावा अशी मागणी शांतता कमिटीच्या वतीने तोफखाना पोलीस ठाण्याचे पोलीस निरीक्षक आनंद कोकरे यांच्याकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.




आत्महत्येचा प्रयत्न करणाऱ्या महिला पोलिस अंमलदारास योग्य न्याय मिळवून देण्याची मागणी करणारे निवेदन तोफखाना पोलिस ठाण्यात देताना शांतता समितीचे सदस्य.

या निवेदनात म्हटले आहे की, नगर शहरात पोलिस कर्मचारी महिलेने आत्महत्येचा प्रयत्न करणे ही अत्यंत दुर्दैवी घटना असुन रक्षणकर्त्यालाच जर भक्ष्य करत असतील तर शांतता समितीचे सर्व सदस्य याचा जाहीर निषेध करतो.

या प्रकरणाचा तपास पारदर्शक व्हावा.अशी मागणी करण्यात आली. अशा गुन्हेगारी प्रवृत्तीचे सामाजिक कार्यकर्ता किंवा कार्यकर्ती जर कोणालाही त्रास देत असतील, किंवा ब्लॅकमेलींग करत असतील, तर त्यांच्या वेळीच मुसक्या आवळने खुप गरजेचे आहे. कारण सामाजिक क्षेत्रात अनेक महिला भगिणी, भाऊ अहोरात्र काम करत आहेत. अशा विकृत व्यक्तिमुळे त्यांच्यावर व त्यांच्या कामावर कोणतेच गालबोट लागता काम नये. तरी या निवेदनाद्वारे मागणी करीत आहे की आमच्या रक्षण करणाऱ्या पोलीस भगिणी किंवा भाऊ यांना योग्य न्याय द्यावा, अशी मागणी करण्यात आली.

या निवेदनावर शांतता समितीचे सदस्य श्रीमती नलिनी गायकवाड, ॲड. विद्या जाधव, रियाज कुरेशी, परवेज शेख यांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# बंद असलेले भाग्योदय मंगल कार्यालय खुले होणार

### आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांची माहिती; आ. संग्राम जगताप यांच्या सूचनेनुसार अहिल्यानगर महानगरपालिकेकडून केडगावात कार्यालय स्वच्छता अभियान

नगर – महानगरपालिकेच्या केडगाव येथील भाग्योदय मंगल कार्यालयाची दुरावस्था झाली आहे. कोविड काळापासून ते बंद अवस्थेत आहे. त्यामुळे नागरिकांची गैरसोय होत होती. आमदार संग्राम जगताप यांनी हे कार्यालय पुन्हा नागरिकांसाठी खुले होण्याच्या दृष्टीने उपाययोजना करण्याचे निर्देश दिले आहेत. त्यानुसार मंगळवारी महानगरपालिकेने स्वच्छता अभियान राबवून हे कार्यालय स्वच्छ केले. तेथील किरकोळ दुरुस्तीची कामे करून लवकरच हे कार्यालय नागरिकांसाठी खुले करण्यात येणार असल्याचे आयुक्त तथा प्रशासक यशवंत डांगे यांनी सांगितले.





आमदार संग्राम जगताप यांच्या सूचनेनुसार अहिल्यानगर महानगरपालिकेकडून केडगावात कार्यालय स्वच्छता अभियान राबविण्यात आले.

कोविड काळापासून भाग्योदय मंगल कार्यालय बंद अवस्थेत आहे. तेथे विद्युतीकरण व काही दुरुस्तीची कामे प्रलंबित आहेत. तसेच, तेथे मोठ्या प्रमाणात अस्वच्छता होती. तेथील नागरिकांनी कार्यालय पुन्हा सुरू करण्याची मागणी आमदार जगताप यांच्याकडे केली आहे. त्यांच्या सूचनेनुसार या कार्यालयाच्या स्वच्छतेसाठी मंगळवारी अभियान राबविण्यात आले. तेथील सर्व प्रकारचा कचरा उचलून स्वच्छता करण्यात आली. तसेच, जेटिंग मशिनच्या माध्यमातून संपूर्ण कार्यालय धुवून स्वच्छ करण्यात आले. परिसरातील नागरिकांनीही यात सहभाग घेतला.

दरम्यान, कार्यालयाचे शटर, विद्युतीकरण व इतर किरकोळ दुरुस्त्या करण्याचे आदेश देण्यात आले आहेत. लवकरच हे कार्यालय नागरिकांच्या सेवेसाठी खुले करण्यात येईल, असे यशवंत डांगे यांनी स्पष्ट केले.

# विकासकामाच्या माध्यमातून केडगावला नवी दिशा देण्याचे काम केले

### आ. संग्राम जगताप यांचे प्रतिपादन; लिंक रोड परिसरातील ओपन स्पेसमधील सांस्कृतिक भवन कामाचे भूमिपूजन व वृक्षारोपण

नगर – शहरात पूर्वी पावसाळा आला की रस्ता पॅचिंगचे काम हाती घेतले जायचे, मात्र आता कायम स्वरूपीची रस्ता काँक्रीटकरण्याची कामे मार्गी लागत आहे. सुसज्ज रस्ते आणि बहुमजली इमारती शहराच्या वैभवात भर टाकताना दिसत आहे. केडगाव हे शहराचे सर्वात मोठे उपनगर आहे. पुणे महामार्ग ते कल्याण महामार्गाला जोडणाऱ्या लिंक रोडचे काँक्रीटीकरणाचे काम पूर्ण झाले आहे. या रस्त्यावरील जुना दगडी पुल काढून आरसीसी पुलाचे काम मार्गी लावले आहे. आता लवकरच या ठिकाणी पथदिवे बसविण्यात येणार असून शासनाकडे निधीसाठी पाठपुरावा सुरू आहे. स्थानिक स्वराज्य संस्थेच्या निवडणुका लवकरच होणार आहे. आता इच्छुक लोक तुमच्याकडे येत आहे. जे पाण्याचे कनेक्शन देऊ शकत नाही ते सांगतात आम्ही कामे केली आहे. आता ही निवडणूक पाणी, गटार, स्वच्छता, आरोग्याचे प्रश्न सोडवण्यासाठी होणार आहे. तरी आपण काम करणाऱ्या माणसाच्या पाठीमागे उभे राहणे गरजेचे आहे. जे एल पी रेसिडेन्सी भागातील नागरिकांनी एकत्रित येऊन सांस्कृतिक भवनाचे काम सुरू केले आहे, तसेच वृक्षारोपण करून त्याचे संवर्धन केले जावे, हाती घेतलेला उपक्रम लोक चळवळ म्हणून पुढे घेऊन जावा. केडगाव परिसराला विकास कामाच्या माध्यमातून नवी दिशा देण्याचे काम केले आहे. सर्वांनी एकत्रित येऊन सकारात्मक ऊर्जा घेऊन विकासाचे प्रश्न मार्गी लावावे, असे प्रतिपादन आमदार संग्राम जगताप यांनी केले.



सांस्कृतिक भवन कामाचे भूमिपूजन व वृक्षारोपण करण्यात आले. (छाया – लहू दळवी)

केडगाव जे एल पी रेसिडेन्सी लिंक रोड परिसरातील ओपन स्पेसमधील सांस्कृतिक भवन कामाचे भूमिपूजन व वृक्षारोपण झाले. यावेळी आमदार संग्राम जगताप, संभाजी पवार, विशाल पवार, राजेंद्र शिंदे, उद्योजक दिलीप दहिफळे, कृष्णा लांडे, जालिंदर पालवे, शिवाजी नाईकवाडे, आप्पासाहेब गागरे, संदीप भोर, मेजर वसंत वाव्हळ, सुरेश नन्नवरे, सचिन म्हस्के, दिलीप गांधी, सुनील कांबळे, संभाजी पवार, उषा नाईकवाडी, मंदा ननवरे, उमादेवी राऊत, अनिता ढाकणे, अश्विनी म्हस्के, ज्योती जाधव, दिलीप कपिले, कारभारी सांगळे, अनिल जाधव, नागनाथ घोडके, सावळेराम पुंड आदींसह रहिवासी उपस्थित होते.

दिलीप दहिफळे म्हणाले की, केडगाव जे एल पी रेसिडेन्सी लिंक रोड परिसरातील विविध विकासाची कामे आमदार संग्राम जगताप यांनी मार्गी लावले आहे. नागरिकांनी एकत्रित येऊन सांस्कृतिक भवन उभे करण्याचे काम सुरू केले आहे. केडगाव औद्योगिक वसाहतमधून रस्ता काँक्रिटीकरणाचे काम पूर्ण झाल्यामुळे या परिसराला सुशोभीकरणाचे रूप प्राप्त झाले आहे. या ठिकाणी झाडे लावून त्याचे संवर्धन केले जाणार आहे. या परिसरातील लाईट, पिण्याचे पाणी, घंटागाडी तसेच सांस्कृतिक भवनाला संरक्षण भिंतीचे काम मार्गी लावण्याचे आश्वासन आमदार संग्राम जगताप यांनी दिले. विकास कामातून केडगावचे रूप बदलले असल्याचे ते म्हणाले.

# वेळेत काम पूर्ण न झाल्यास शिवसेना आंदोलन करणार

### काम पूर्ण होईपर्यंत ठेकेदाराचे बिल अदा न करण्याची मागणी

नगर – मागील आठवड्या–मध्ये अहिल्यानगर शहरातील कल्याण रोड परिसरातील सीना नदीवर बांधण्यात येत असलेल्या नवीन पुलाचे काम त्वरित सुरू करण्याची मागणी शिवसेनेच्या वतीने अधिकाऱ्यांना घेराव घालून करण्यात आली होती. त्यानंतर पुणे येथून राष्ट्रीय महामार्गाच्या अभियंता यांनी शहरात सुरू असलेल्या सेना नदीवरील पुलाच्या कामाची पाहणी केली. तसेच संबंधित ठेकेदाराच्या दिरंगाईमुळे हे काम पूर्ण होण्यास उशीर होत असल्याकारणाने ठेकेदारास देखील दंडात्मक कारवाई केल्याचं अधिकाऱ्यांनी सांगितले. तसेच नोव्हेंबर महिन्यांमध्ये हे काम पूर्ण केलं जाईल असे अधिकाऱ्यांनी म्हटलं आहे. संभाव्य पुराचा धोका ओळखून या ठिकाणी कायमस्वरूपी कर्मचारी ठेवणार असून तसेच पुलावरून पाणी वाहत असल्यास कर्मचाऱ्यांना बॅरिकेट करण्याची व्यवस्था देखील करण्यास सांगितली आहे असं पुणे येथून आलेल्या अधिकाऱ्यांनी सांगितले आहे.



शिवसेनेने आंदोलनाचा इशारा देताच राष्ट्रीय महामार्गाचे अभियंता नगर कल्याण रोडवरील सीना नदीच्या पुलाची पाहणी करण्यासाठी हजर झाले. शिवसेनेचे पदाधिकारी व राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी उपस्थित होते.

संबंधित ठेकेदाराने या पुलाचे काम लवकरात लवकर पूर्ण करावे व हा रस्ता नागरिकांना येण्या जाण्यासाठी खुला करावा अन्यथा शिवसेनेच्या वतीने आंदोलन केलं जाईल असा इशारा संभाजी कदम यांनी दिला आहे. यावेळी शहर प्रमुख सचिन जाधव, माजी सभापती गणेश कवडे, माजी गटनेते संजय शेंडगे, माजी नगरसेवक सुभाष लोंढे, शाम नळकांडे, सचिन शिंदे, दत्ता कावरे, प्रशांत गायकवाड़, संदीप दातरंगे यांच्यासह पदाधिकारी व राष्ट्रीय महामार्गाचे अधिकारी उपस्थित होते.

मालक, मुद्रक, प्रकाशक, संपादक सुभाष चंदनमल गुंदेचा यांनी नवा मराठा मुद्रणालय, आचार्य गुंदेचा चौक, अहिल्यानगर येथे हे पत्र छापून येथेच प्रसिद्ध केले.

